. ग्रं. सं. ठाणें

# …ताचे काव्यग्रंथ.

(१) नल-दमयंती-स्वयंवराख्यान,

(२) रामदास-वर्णन,

(३) गजेंद्रमोक्ष.

[ अलपचरित्र व भरपूर टीका यांसहीत ]

प्रकाशकः—

हरी त्रिंबक थापट.

REFBK-0000544

किंमत ०॥ आणे.

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# रघुनाथपंडिताचे काव्यग्रंथ.

(१) नळ–दमयंती–स्वयंवराख्यान,

(२) रामदास–वर्णन.

(३) गजेंद्रमोक्ष.

[ अल्पचरित्र [illegible] यांसहीत ]

REFBK-0000544

REFBK-0000544

[illegible]

यांनीं तयार करून

[illegible] येथें रा. रा. सदाशिव लक्ष्मण सोमण बी. ए., एल्. एल्. बी. यांच्या ‘मनोहर’ प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केलें.

डिसेंबर, सन १९०९.

किंमत ३॥ आणे. ट. खर्च निराळा.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) हरी त्रिंबक बापट, शनवार पेठ, घरनंबर १५४, पुणें.

( २ ) रा. भागवत, फोटोग्राफर, तुळशीबागेचे द[illegible] समोर, काष्ठौषधींचे दुकानाशेजारीं, बुधवार पेठ, पुणें

( ३ ) पूना टाइप राइटिंग कंपनीचे मॅनेजर या[illegible] बुधवार चौक, पुणें.

# प्रस्तावना

गद्यग्रंथ वाचण्याचीच ज्यांना विशेष आवड असेल त्यांची गोष्ट निराळी; परंतु पद्यात्मक ग्रंथ वाचण्याकडे ज्यांची प्रवृत्ती असते त्यांना त्या ग्रंथांतून बऱ्याच प्रसंगीं गद्यग्रंथापेक्षांही अधिक माधुर्य असल्याचें अनुभवास आले असेल. पद्यग्रंथांतून कोणता विषय असावा याविषयीं अनेक मतें आहेत, तथापि प्रस्तुत कवीचे ग्रंथ गद्यात्मक असते तर इतकी त्यांची प्रसिद्धी झाली नसती. या कवीचे '**नलदमयंती-स्वयंवराख्यान**' प्रसिद्ध असल्यामुळें तें पुष्कळांच्या वाचण्यांत आलेंच असेल. हल्लींच्या नव्या नवनीताच्या आवृत्तींत या आख्यानांतील २१ कविता कमी करण्यांत आल्या आहेत. हें आख्यान स्वतंत्र पुस्तकरूपानें मिळण्याची कोठें व्यवस्था झाल्याचें दिसून न आल्यामुळें तें छापविण्याचें प्रथम माझे मनांत आलें, व मजजवळ असलेल्या १८६४ च्या जुन्या नवनीताच्या प्रतीवरून मी तें लिहून काढलें. परंतु पुढें साहित्यपरिषदेच्यामार्फत प्रसिद्ध झालेलें 'महाराष्ट्र काव्यग्रंथाची यादी' हें पुस्तक सहज पाहण्यास मिळालें. त्यांत सदरहू कवीनें केलेले व प्रसिद्ध झालेले असे तीनच ग्रंथ लिहिले आहेत. त्यासंबंधानें चौकशी केल्यावरून त्यांपैकीं दोन ग्रंथ पूर्वी ग्रंथमालेंत प्रसिद्ध झाल्याचें रा. रा. वि. ल. भावे यांनीं मला मेहेरबानीनें लिहून कळविलें याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. ते दोन ग्रंथ:—( १ ) **रामदासवर्णन** व ( २ ) **गजेंद्रमोक्ष** हे होत. हे दोन ग्रंथ पुण्यांतील एक सद्गृहस्थ रा. राजवाडे यांनीं त्यांच्याजवळ असलेल्या फाईलमधून मला काढून दिले याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. वरील तिन्ही ग्रंथ थोडेसें शुद्ध करून व त्यांतील कवितांवर त्यांचीं वृत्तें मुळांत नव्हतीं, तीं नवीन घालून व थोडक्यांत टीपा देऊन एकत्र छापले आहेत. या कामीं कांहीं प्रसंगीं माझे मित्रमंडळींनीं व पूर्वाश्रमीचे केशवशास्त्री दामले यांनीं मदत केली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या ग्रंथाचें नांव 'रघुनाथपंडिताचे समग्र ग्रंथ' असें ठेविलें असते तर चालले असतें, परंतु काळमहिमा अगम्य असल्यामुळें 'समग्र' शब्दाचा उपयोग करण्याचें धाडस मी केलें नाहीं.

प्रस्तुत ग्रंथ तयार करण्याचें कामीं मला जुन्या नवनीताचा अतीशय उपयोग करावा लागला, याबद्दल कै. परशुरामपंत तात्या गडबोले यांचे मजवर अत्यंत उपकार आहेत; व त्याचप्रमाणें पुढील दोन ग्रंथ [ रामदास वर्णन व गजेंद्र मोक्ष ] हे पूर्वी ग्रंथमालेंत प्रसिद्ध केल्याबद्दल मी ग्रंथमालेच्या प्रकाशकांचा व हे ग्रंथ शोधून प्रकाशित केल्याबद्दल प्रसिद्ध इतिहाससंशोधक प्रो. राजवाडे यांचा मी अत्यंत आभारी आहे.

या ग्रंथांत जीं अशुद्धें राहिलीं असतील तीं व टीपा देण्यांत कांहीं चुका झाल्या असल्यास त्यांचा दोष मजकडे आहे, व त्याबद्दल सदय वाचकांनीं मला क्षमा करावी अशी त्यांना मी विनंती करितों. पुढील आवृत्तीचे प्रसंगीं त्या शुद्ध करण्याची खबरदारी अगाऊच घेण्यांत येईल.

शेवटीं मराठीं वाङ्मयाचे भोक्ते व अभिमानी वाचक यांनीं माझ्या या अल्प श्रमाचे चीज करून मला अधिक प्रोत्साहन द्यावें अशी प्रार्थना आहे.

पुणें, ता. ४।१२।०९.

प्रकाशक.

वा. क.

॥ श्री गजाननप्रसन्न ॥

# रघुनाथपंडिताचे

## काव्य-ग्रंथ.

## १ नल-दमयंती-स्वयंवराख्यान.

॥ शार्दूलविक्रीडित ॥

पुण्य[1]-श्लोक-नृपावळींत पहिला होवोनि जो राहिला ॥
तो राजा असतां समस्त महिला वि-श्रांति शेषाहिलों[2] ॥
व्यासोक्तें अव-गाहिला बुधजनीं नाना-गुणीं गायिला ॥
जो नामें नळ तत्कथौघ लिहिला तो पाहिजे पाहिला ॥ १ ॥

॥ आर्या ॥

इंद्रादिक वर असतां, कशी नल-सतीच होय दमयंती ॥
सुंदर कल-वधूंतें कशी न वसंतीच[3] होय दर्म[4]-यंती ॥ २ ॥

॥ दिंडी ॥

कथा बोलूं हे मधुर सुधा[5]-धारा ॥
होय शृंगारा करुण रसा थारा ॥
निषध-राजा नळ-नामधेय होता ॥
वीरसेनाचा तनय महा-हेता ॥ ३ ॥
चौगुणीनें[6] जरि पूर्ण शीत-भानू ॥

---

१ नळ, धर्म, सीता व कृष्ण या चार पुण्यवान् लोकांत पहिला.
२ शेषाला (सर्पाला). ३ शुभांगी. ४ गर्व हरण करणारी ५ अमृत.
६ चंद्र चौसष्ट कलांयुक्त होईल तर.

नळा-ऐसा तरि कळा[1]-निधी वानूं ॥
प्रतापाचा जो न मावळे भानू ॥
तयासारिखा कोण दुजा मानूं ॥ ४ ॥

॥ **वसंततिलका** ॥

चंद्रासि लागति कळा[2] उप-रागें[3] येतो ॥
गंगेशि भंगें[4] बहु पाण-उतार होतो ॥
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला ॥
नाहीं समान नळ-राज-महा-यशाला ॥ ५ ॥

॥ **शार्दूलविक्रीडित** ॥

वाजी[5]चें मन जाणता, सकळही राजी शिपाई जया ॥
याजी होउनिया द्विजांसि ह्मणतो याजी धनें घ्यावया ॥
त्याजी जो धन दापरी, सुकृत जें त्या जीवें[6] ऐसें गणी ॥
माजी तो नळ भूप हूँप[7] धरुनी गाजी गुणींच्या गणीं ॥ ६ ॥

॥ **दिंडी** ॥

लोक[8]बंधू जो होय रवी-ऐसा ॥
कुवलयाला[9] जो सुखद चंद्र जैसा ॥
सांग[10] नोहे तो कुसुम-चाप तैसा ॥
निषध-रायाशीं तुल्य-रूप कैसा ॥ ७ ॥

॥ **गीति** ॥

नाडी ज्ञान जयाचें, स रोगें[11]-बंधू चतुष्पद गणावें ॥
सुत तेजी तुरंगीचे[12]; नळ-सम सुंदर कदापि न ह्मणावे ॥ ८ ॥

---

१ चौसष्ट कला (कौशल्य) युक्त. २ क्षयवृद्धि. ३ ग्रहण. ४ लाटा. ५ घोडा. ६ प्राणाच्या किंमतीप्रमाणें पुण्य ( सत्कर्म ) समजे ७ हुरूप. ८ लोकहितकर्ता. ९ चंद्रविकासी कमळ; पक्षी, कू=पृथ्वी इचें वलय. १० अगासहित. ११ देवांचा वैद्य. १२ अश्विनीकुमार.

॥ शिखरिणी ॥

कदा नेणों वेढी शरधिंतुनि काढी शर कदा ॥
कदा धन्वीं[1] जोडी वरिवरिहि सोडी तरि कदा ॥
द्वि-पक्षाच्या[2] वक्षावरि विवर-लक्षास्तव[3] रणीं ॥
कळे राजेंद्राची त्वरित शर-संधान-करणी ॥ ९ ॥

॥ वसंततिलका ॥

धाले[4] धनी पुढिल याचक या नळाचे ॥
येतां फिरोनि समुदाय पथीं तयांचे ॥
मागावयास जन मागिल देखियेले ॥
त्यांहींच ते सकळ पूरित-काम केले ॥ १० ॥

॥ दिंडी ॥

अशी अ-गणित गुण कीर्ति नैषधाची ॥
फिरे भुवन-त्रयिं जान्हवीच[5] साची ॥
असें असतां द्विज पांच सात याची ॥
भेटि घेती वैदर्भ-राजयाची[6] ॥ ११ ॥

॥ वसंततिलका ॥

द्वारीं झुलोत गज-संघ हिंसोत[7] तेजी[8] ॥
गाजी तुला सकल लोक असोत राजी ॥
सोमाभिराम[9] वदना सदनांतरंगीं[10] ॥
क्रीडा करो तुजसवें ललना पलंगीं ॥ १२ ॥

---

१ धनुष्य धारण करणारा. ( सर्व वर्णन नळराजाचें आहे. ) २ शत्रूच्या. ३ व्रण दिसल्यामुळें. ४ तृप्त झाले. ५ भागीरथी. ६ भीमराजाची ७ खिंकाळोत. ८ घोडे. ९ चंद्राप्रमाणें रमविणारें मुख जिचें. १० अंतःपुरांत.

॥ दिंडी ॥

अशा आशिर्वादासि तिहीं केलें ॥
भीम-भूपें मग तयां बोलिजेलें ॥
तुह्मी आलां कोठूनि अशा बोलें ॥
द्विजीं निषधापासाव ह्मणीजेलें ॥ १३ ॥

॥ दिंडी ॥

भीम भूपाळ गिरा वदे ऐसी ॥
निषध-देशीं नळ-राज-रिति कैसी ॥
असें ऐकोनी वदति विप्र त्यासी ॥
विप्रयासीं वक्तृत्व ये जयांसी ॥ १४ ॥

॥ वसंततिलका ॥

हे वामनैक[1]-पद भूमि; नसोनि जंघी[2]- ॥
एके दिशींच दिन राज नभास लंघी ॥
वारीशि[3] वानर-विलंघित होय तो कीं ॥
लोकीं नसे नल-यशस्तुलना[4] विलोकीं ॥ १५ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

जो पाहे सदसद्विचार हृदयीं जोपा जनाची करी ॥
जो पावे समयीं, विशेष गणिला जो पावनांभीतरीं[5] ॥
सोपा जो सकळां द्विजा, सुमतिचा सोपा[6], सदा लाभतो[7] ॥
कोपातें न धरीच तो नळ मही गोपायिता शोभतो ॥ १६ ॥
जो धैर्यें धर[8]-सा, सहस्रकर-सा तेजें, तमा दूर सा ॥
जो रत्नाकर[9]-सा, गभीर, शिरसा भूपां, यशोहार-सा ॥

---

१ वामनाच्या पावला इतकी, ( मापलेली ) २ वेगानें चालणारा. ३ समुद्र ४ भूमि, आकाश, व समुद्र यांची नळाच्या यशाला उपमा देववत नाहीं असा अर्थ. ५ पवित्र करणारांत. ६ घर ७ ज्यापासून नेहमीं लाभ होतो. ८ पर्वत. ९ समुद्र.

ज्ञाता जो सरसावला[1], नव-रसांमाझारि शृंगार[2]-सा ॥
शोभे तामरसाक्ष[3] तो नळ रसा-नाथ स्तवूं का ? सा ॥ १७ ॥

॥ दिंडी ॥

अशी होतां नळ-चरित-कथा कांहीं ॥
भीम-नामा भूपाळ परिसतांही ॥
जवळि होती लडिवाळ जे सदाही ॥
सुता दमयंती नाम जीस पाहीं ॥ १८ ॥

॥ मालिनी ॥

निषध-पति-कथा हे जे सुधेतें जयंती ॥
परिसुनि दमयंती रंजली रंजयंती ॥
नवल मज न भासे चंद्र-वंशैक-शाली ॥
नल तरि वन-माळी[4] भीमकी[5] हेचि झाली ॥ १९ ॥

॥ माल्यभारा ॥

नळ-राज-कथा सुधां[6]चि साजे ॥ दमयंती वर[7]—वर्णिनी विराजे ॥
मिळणी उभयांशि होय जेथें । अधिकारी अधिकानुराग तेथें ॥

॥ दिंडी ॥

नैषधी ते मोहिली गुणरूपें ॥
मनीं लावियला वेध कुसमचापें ॥
असो गौरविले विप्र तिच्या बापें ॥
धनें वसनें त्यां दाधलीं अमूपें ॥ २१ ॥
कथा तेथिल ही होय असो ऐशी ॥

---

१ पहिला आला. २ नऊ रसांत शृंगाराप्रमाणें पहिला. ३ कमलासारखे डोळे. ४ कृष्ण ५ रुक्मिणी. ६ अमृत ७ उत्तम स्त्री. ८ दोघे एकत्र झाल्यावर प्रीतीच उत्पन्न होणार असा भावार्थ.

हेर आला तो वदे नैषधासी ॥
तुझ्या कथनीं वैदर्भ-राजयासी ॥
प्रीति होती तनयाहि तयापासी ॥ २२ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

बापाच्या उजवे कडेसि बसली म्यां पाहिली नोवरी ॥
व्यापारांतर टाकुनी तव कथालापासि जे आदरी ॥
तापातें हरितें करोनि मधुरालापासि जे सुंदरी ॥
ज्या पावे जगदीश सांग-सुमन-श्रीपा[1] नृपा त्या वरी ॥ २३ ॥

॥ वसंततिलका ॥

जें अंतरंग पिंवळें सरसीरुहाचें[2] ॥
भासे मनांत मज अंग तसें तियेचें ॥
गोरोचनापरिस गौर असें गणावें ॥
सोनेंच बावनकसी न कसें म्हणावें ॥ २४ ॥

॥ दिंडी ॥

असें बोले तो चार समाचारा ॥
करी दमयंती नल-मनीं विहारा ॥
नोवरी हे मज होय कशी दारा ॥
करूं लागे तें भूप या विचारा ॥ २५ ॥
विभूतीनें[3] झांकला अनळ-ता तो ॥
गुप्त दमयंती-विरह नृपा होतो ॥
नित्य पोटीं वडवाग्नि पेट घेतो ॥
सागरानें तो काय सांगिजेतो ॥ २६ ॥

---

१ अंगयुक्त मदन अशा. २ कमळाचें ३ मूर्ति.

॥ वसंततिलका ॥

बाणी मनोजशर[1] हार-तुरे फुलांचे ॥
कंदर्प कोपवचनें[2] ध्वनि कोकिलांचे ॥
राका[3] शशी मदन दर्पण भाविलां[4] हे ॥
ने घेचि तो न परिसे न तयासि पाहे ॥ २७ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

छायानायक-सा[5] निदाघसमयीं[6] छाया करी तो विधू[7] ॥
वाया या हृदयाश्रमासि करितो दायादसा[8] हा मधू[9] ॥
जाया जे रुचली मनीं तिजकडे जायां[10] न ये कीं पहा ॥
रायाला न गमे न जाय रजनी आयास होती महा ॥ २८ ॥

॥ आर्या ॥

रजनी दिवस गमेना नृपतिस संगीतही सुख गमेना ॥
मन कोठेंहि रमेना ह्मणोनि करि वन-विहार सह सेना ॥ २९ ॥

॥ वसंततिलका ॥

गंगा-तरंग-सम जो निज देह वर्णी ॥
भृंगापरी रुचिर कांति जयाशि कर्णी ॥
जंघाळ[11] जो पवन-सं-गतिची[12] सवे वे ॥
शृंगारिला हय तयावरि भूप बैंसे ॥ ३० ॥
जो अंबरीं उफळतां[13] खुर लागलाहे ॥
तो चंद्रमा निज-तनूवरि डाग लाहे ॥

---

१ मदनाचे बाण. २ कोकिलांचे मंजूळ ध्वनि हीच मदनाची कठोर वचनें. ३ पौर्णिमा. ४ मानिला. ५ सूर्य ६ ऊष्णकाळी. ७ चंद्र. ८ शत्रू, ९ वसंतकाळ १० जाण्याला, ११ वेगवान, [ सर्व घोड्याचें वर्णन ] १२ ( वायूच्या वेगाची ) संवय. १३ उडतांना.

जो या यशास्तव करी धवल-छत्र नेघे ॥
शृंगारिला हय तयावरि भूप बैंघे ॥ २१ ॥

॥ दिंडी. ॥

सर्व सेना भूपाळ निघालाहे ॥
शींव लंघी उद्यान एक पाहे ॥
रिघे तेथें मित सेवकांसि[1] बाहे ॥
फौज सारी बाहेर उभी राहे ॥ २२ ॥
पनस जंबू जंबीर विविध निंबें ॥
कुंद चंदन माकंद[2] सुदाडिंबें ॥
तुंग नारिंगें विकसिलीं कदंबें ॥
वसति तेथें शुक-सारिका-कदंबें[3] ॥ २३ ॥

॥ वंशस्थ. ॥

लते-तळीं रुंद निरुंद कालवे ॥
गळोनि तेथें मकरंद कालवे ॥
परागही[4] सांद्र तयांत रंगती ॥
फुलांसवें भृंग-तती तरंगती ॥ २४ ॥

॥ आर्या ॥

उपरि स-कंटक साचे परंतु सांचे जगांत सुरनाचे ॥
घोस असे फणसांचे षण्मासांचे कितेक वरसाचे २५

॥ उपेंद्रवज्रा ॥

तया वनीं एक तटाक तोयें ॥ तुडुंबलें, तामरसांनपायें[7]– ॥
निरंतरामंद मरंद वाहे ॥ तापांतही यास्तव रिक्त नोहे ॥ २६ ॥

---

१ बोलाविले. २ आंबा ३ समूहानें ४ फुलांतील रज ५ दाट. ६ गरे. ७ नाशरहित कमलांमुळें.

॥ द्रुतविलंबित ॥

अमृतही पयही म्हणवीनसे ॥
उभय होय तसी रुचि वीतसे ॥
मधुर सा[१]रस तें जल गा तसें ॥
मधुर सा[२]रस यास्तव गातसे ॥ ३७ ॥

॥ वसंततिलका ॥

पीतां मरंद उदरं[३]भर भ्रमरांचें ॥
जें होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें[४] ॥
जें पद्म तेथिल सहस्र-दळां धरीतें ॥
प्रत्यक्ष सूर्यकिरणांस विसाववीतें ॥[५] ३८ ॥

॥ दिंडी ॥

तया का[६]सारीं राजहंस[७] पाहे ॥
राजहंसाचा कळप पोहताहे ॥
तयांसाठीं हे वापिकाच पोहे ॥
नळें केली हे कोण म्हणे नोहे ॥ ३९ ॥
तया हंसांचे देह कांचनाचे ॥
पक्ष झळकती वीज जशी नाचे ॥
रंग माणिकसे चंचुचे पदांचे ॥
जसे अधरींचे भीम-क[८]न्यकेचे ॥ ४० ॥

॥ वसंततिलका ॥

त्यांतील एक कलहंस तटीं निजेला ॥
जो भागला जल-विहार विशेष केला ॥

---

१ सरोवरांतील २ पक्ष्याची एक जात. ३ पोटार्थी भ्रमर ४ पद्मालय [लक्ष्मी] तिचें कमल हें मंदिर. ५ कमलें मोठीं असल्यामुळें सूर्य किरणें पाण्यावर न पडून तें गार असे असें तात्पर्य. ६ सरोवरांत ७ नृपश्रेष्ठ नळ. ८ दमयंतीच्या.

पोटींच एक पद, लांबविला दुजा तो ॥
पक्षीं तनू लपवि भूप तया पहातो ॥ ४१ ॥
टाकीं उपानह[1] पदें अति-मंद ठेवी ॥
केली विजार वरि डौरहि[2] मौन सेवी ॥
हस्तीं करी वलय उंच अशा उपायीं ॥
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं ॥ ४२ ॥

॥ मालिनी ॥

कळकल कलहंसें फार केला सुटाया ॥
फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया ॥
नृपतिस मणि-बंधीं[3] टोंचिता होय चंचू ॥
धरि सुदृढ जया तो काय सोडील पंचू[4] ॥ ४३ ॥
तदितर खग[5] भेणें[6] वेगळाले पळाले ॥
उपवन-जल-केली[7] जे कराया मिळाले ॥
स्वजन गवसला जो त्याजपाशीं[8] नसे तो ॥
कठिण समय येतां कोण कामास येतो ॥ ४४ ॥

॥ दिंडी ॥

न सोडी हा नळ भूमिपाळ मातें ॥
असें जाणोनी हंस वदे त्यातें ॥
हंस-हिंसा नच घडो तुझ्या हातें ॥
स्वस्थकातें पाविन पक्षपातें ॥ ४५ ॥
जागजागीं आहेत वीर कोटी ॥

---

१ चर्मी जोडा. २ झगा ३ मनगटावर. ४ पकडणारा. ५ हंस-समूह. ६ भयानें ७ क्रीडा. ८ अन्वय जो गवसला त्याजपाशीं. ९ उडून

भले झुंजारहि शक्ति जयां मोठी ॥
तयां माराया धैर्य धरीं पोटीं ॥
पाखरूं हे मारणें बुद्धि खोटी ॥ ४६ ॥
वधुनि माझी हे कनक रूप काया ॥
कटक-मुकुटादिक भूषणें कराया ॥
कशी आशा उपजली तूज राया ॥
काय नाहीं तूजला दया माया ॥ ४७ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

झातारी उडतां नयेचि तिजला माता मदीया अशी ॥
कांता काय वदों नव--प्रसव ते सातां दिसांची तशी ॥
पाता त्या उभयांस मी, मज विधी घातास योजीतसे ॥
हातामाजि नृपा तुझ्या गवसलों आतां करावें कसें॥४८॥

॥ पद ॥

हर हर सांपडलों, सांपडलों ॥ कैसा फांशीं पडलों ॥धृ०॥
इतर नदी जळ टाकीं॥ टाकुनि आलों याच तटाकीं ॥
सोडुनि मानसें केली॥ कापुनि ध्याया आलों शेली ॥ ५०
ठेविन तव पदिं माथा॥ आतां सोडविं मज रघुनाथा॥ ५१

॥ दिंडी ॥

सखे माझे परतोनि घरा येतां ॥
तुवां सजणे हा समाचार घेतां ॥
तया शोकें घायाळ हृदय होतां ॥
कशी होशिल तें आठवितों आतां ॥ ५२ ॥
थोर होतिल बाळकें तुझीं बाळे ॥

---

१ माझी [झातारी आई ]. २ नवीन बाळंतिण. ३ पालनकर्ता ४ मानस सरोवरांतील क्रीडा. ५ मान. ६ हे प्रिये.

तुला कामा येतील वेल्हाळे ॥
माय माझी बैसेल शोक-शाळे ॥
मला आठवितां हृदय तिचें पोळे ॥ ९३ ॥

॥ मालिनी ॥

सदय हृदय याचें भूप हा ताप-हारी ॥
ह्मणुनि परिसतां मी होय एथें विहारी ॥
मजहि वध कराया घातकी पातला जो ॥
वरुनि पति असा ही भूमि कैसी न लाजो ॥९४॥

॥ वसंततिलका ॥

एणेंपरी परिसतां अति दीन वाचा ॥
हेलावला नळ पयोधि दया रसाचा ॥
सोडी, ह्मणे विहर जा अथवा फिराया ॥
राहें यथा निज मनोरथ हंस-राया ॥ ९५ ॥

॥ मालिनी ॥

सुटुनि खग पळाला बैसला शैलशाखे ॥
क्षणभरि निजदेहीं मुक्ति-विश्रांति चाखे ॥
स्वजन तंव तयाचे भोंवताले मिळाले ॥
कवळिती निजबंधू बाष्पबिंदू गळाले ॥ ९६ ॥

॥ शिखरिणी. ॥

विसांवा घे कांहीं उडुनि लवलाहीं परतला ॥
नृपाळाचे स्कंधीं बसुनि मणि-बंधीं उतरला ॥
ह्मणे हंस क्षोणी-पतिस तुज कोणी सम नसे ॥
दयेचा हा ठेवा तुजजवळि देवा बहु वसे ॥९७॥

१ क्रीडायुक्त. २ उचंबळला. ३ एक झाड. ४ त्वरेनें. ५ पृथ्वी.

॥ दिंडी ॥

ऐक राया तूं थोर दया-सिंधू ॥
नीति-सागरही तूंच दीन-बंधू ॥
निखंदूनी बोलिलें नको निंदूं ॥
सकल वदसी तरि पाय तुझे वंदूं ॥ ५८ ॥
पारधीमाजी खगा मृगा राजे ॥
करिति हिंसा जी तीच बरी साजे ॥
तुवां दिधली मज मोकळीक बा जे ॥
दया केली ही कीर्ति तुझी गाजे ॥ ५९ ॥
हंस मिळणें हें कठिण मही-लोकीं ॥
सोनियाचा तो नवल हें विलोकीं ॥
तशा मजलाही सोडिलें तुवां कीं ॥
तुझा ऐसा उपकार मी न झांकीं ॥ ६० ॥
तुझा कर-पंजर होय मला थारा ॥
तुझा वचनांचा ओघ दुग्ध-धारा ॥
तुझें मानस बहु थोर गा उदारा
सत्य-लोकेशहि तूंचि गुणागारा ॥ ६१ ॥
किती रावे असतील तुझे धामीं ॥
किती कोकीळा सारिका तसा मी ॥
चित्त जडलें हें तूझिया लगामीं ॥
नृपा स्वामी मज योजिं तुझ्या कामीं ॥ ६२ ॥

॥ वसंततिलका ॥

हें पाखरूं मजसि येइल काय कामा ॥

१ झिडकारून. २ सर्वजण [ हंससमूहाबद्दल ].

ऐसें नृपा न वद पूरित-लोक-कामा ॥
मोलें उणें व्यंजन[1] तें धरितां पुढारी ॥
छाया करी तपन-दीप्तिसही निवारी ॥ १३ ॥

॥ द्रुतविलंबित ॥

विरहिसा दिसतोसि महा-नळा ॥
परि हरीन तुझ्या विरहा-नळा ॥
चतुर जी तरुणी हृदयंगमा[2] ॥
करवितों तिजशीं तुज संगमा ॥ १४ ॥

॥ मालिनी ॥

वैर[3]-नृपति विराजे भीम हें नाम ज्याला ॥
वैर[4] दमन-ऋषीनें दीधला कीं तयाला ॥
वैर[5]-सुत दम-नामा, दांत-नामा द्वितीय ॥
वैर[6]-तनु दमयंती नंदिनी[7] हे तृतीय ॥ १५ ॥

॥ वसंततिलका ॥

तेजो[8]-निधीस तनया यमुना जसी ते ॥
सीता जशी सु-जनका[9] जनकां[10] तसी ते ॥
ते आवडे सुतहि ते न तसे तयाला ॥
तें नोवरी करवितों तुज मी दयाळा ॥ १६ ॥
राया तिचें मुख सुधा[11]-कर या द्वयाला ॥
नाहींच वेगळिक हें गमतें[12] मनाला ॥
संपूर्ण नित्य असता नसता कलंकी[13] ॥
हा चंद्र हें मुख असें मग कोण शंकी ॥ १७ ॥

---

१ पंखा. २ हृदयांत वास करणारी. ३ श्रेष्ठ. ४ देणगी. ५ पहिला मुलगा. ६ सुंदर. ७ मुलगी ८ सूर्य. ९ जनक राजाला. १० बापाला ११ चंद्र. १२ वाटलें असतें. १३ लांच्छनयुक्त.

चांपेकळीपरिसही सरल-त्व-नाकीं ॥
जीचा धरी अधर विद्रुम-भावना कीं ॥
भासे मनांत मज बिंब-फळ-भ्रमानें ॥
कीं सत्य चंचु-पुट वोढविलें शुकानें ॥ ६८ ॥
तीं डोंगरीं उपजलीं पिवळीं विशाळें ॥
निंबें तशीं नव-घन-स्तन चक्रवाळें ॥
त्या पंकजांत मिनेला अलिसक्त तो कीं ॥
जो नीलिमा सुनयनीं सुजना विलोकीं ॥ ६९ ॥
जों जों घन-स्तन भरूं अवकाश देतो ॥
तों तों तिचा उर भरींव दिसोनि येतो ॥
जों जों दिसे उर भरींव तयाशि तों तों ॥
राया उरोज मय-रूप असें पहातों ॥ ७० ॥
विस्तीर्ण वर्तुळ उदग्र कठोर भारी ।
वर्धिष्णु ते स्तन तिचे कनकानुकारी ॥
ज्याचे उरीं उमटतील ठसे तयांचे ॥
बोलों किती सुकृत-संघ सख्या तयाचे ॥ ७१ ॥
नोहेच नाभि तरि काय सुरंग आहे ॥
रोमावळी गमतसे मज श्रृंखळा हे ॥
राया असे स्तन तिचे, गड घ्यावया तो ॥
राजा मनोभाव उपाय जणो करीतो ॥ ७२ ॥

---

१ पोंवळ्याशीं सारखेपणा, २ तोडलें. ३ राघूनें. ( दमयंतीच्या नाकावर राघूच्या चोंचीची उत्प्रेक्षा केली आहे. ) ४ वर्तुलाकार. ५ मिसळला. ६ आसक्त असलेला भ्रमर. ७ स्तन. ८ उंच. ९ वाढणारे

॥ पद ॥

रूपवती ते भूप-सुता अनुरूप नसे दुसरी वनिता[1] ॥
रूप धरूनि वरीं तिजला अनुरूप पयोधि[2] जशी सरिता[3] ॥
वीज अचंचळ शीतळ जे तजवीज कशी तुज हे नुमजे[4] ॥
नीज जशी तुझिया नयना सुख-बीज सपल्लव भावें लता ॥ १ ॥
सुंदरता तव तीजविणें अति मंद गमे तरी काय जिणें ॥
कुंदरदां तर मंदर[5]-धीरा सुंदरिला हो वश करिता ॥ २ ॥
नूतन-नीरज[6] नूतमुखी[7] पुरु-हूर्त[8] वधूसि सखी निरखी ॥
दूत तुझा परि मीच सुखी करवीन म्हणे रघुनाथ[9]-नुता ॥ ३ ॥

॥ वसंततिलका ॥

धाता[10] करींच करिता मृदु हे न होती ॥
या कारणास्तव मनोमय मूस ओती ॥
तेथें भरोनि पहिला रसें[11] पूर्ण केली ॥
ओतीव हे न-घटितां[12]कृति बोलिजेली ॥ ७३ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

रंभा काय तिच्यापुढें विगत[13]भारंभा दिसे मेनका ॥
जंभाराति[14]-नितंबिनी परि तदा हं भावते[15] हीनका ॥
कुंभाकार कुचा महा-वर वधू संभावना[16]गाहिनी ॥
रंभा-दंभ-जया[17] समोरु-सरल-स्तंभा मनोमोहिनी ॥ ७४ ॥

---

१ स्त्री. २ समुद्र. ३ नदी. ४ समज. ५ पर्वताप्रमाणें गंभीर. ६ कमळ. ७ वाखाणलेल्या मुखाची. ८ इंद्र. ९ रघुनाथपंडिताकडून स्तुति केलेल्या नळाला. १० ब्रह्मदेव. ११ शृंगार. १२ न घडलेली. १३ तेजोहीन आहे अशी. १४ इंद्राणी. १५ स्वतःस वाटते. १६ महावर-वधूंच्या कल्पनांत बुडणारी. १७ केळीचा दंभ जिंकणारी.

॥ वसंततिलका ॥

ऐसीं खगेंद्र वचनें वदतां तयाला ॥
विश्रांतिही विरह-खेदहि फार झाला ॥
आधार हा मज म्हणोनि गणोनि डोले ॥
झाला सर्वेचि विरही नळ-राज बोले ॥ ७५ ॥
वेल्हाळ ते न दिसतां विरहांधकारीं ॥
चालून मी हळुच चांचपतां पुढारीं ॥
चक्रापरीच सजलों असतां फिराया ॥
हंसा तुझा उदय होय सुखी कराया ॥ ७६ ॥
ध्यानीं धरूनि तिजला मन हें निरीक्षी ॥
दृष्टीपुढें दिसतसे मज ते मृगाक्षी ॥
आहे जणों जवळि हे गजराजगामी ॥
ऐसाच भाव तंव बोलतसें तिला मी ॥ ७७ ॥
भृंगें विराजित नवीं अरविंद-पत्रें ॥
पाहूनि मानुनि तिचींच विशाल नेत्रें ॥
घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं ॥
आहा वृथा उतरलों भिजलों विलोकीं ॥ ७८ ॥
हंसा विलोकुनि सुधा-कर अष्टमीचा ॥
म्यां मानिला निटिल-देश तिचाच साचा ॥
शंख-द्वयीं धरुनि कौंकुम कीरवाणी ॥
लावावया तिलक लांबविला स्व-पाणी ॥ ७९ ॥

---

१ असें मानून. २ चक्रवाक पक्ष्याप्रमाणें. ३ कमळाचीं पानें. ४ चंद्र. ५ कपाळ. ६ कानाशिलाच्या दोन हाडामध्यें. ७ कुंकवाचा (तिलक शब्दांकडे संबंध.) ८ खरोखर. ९ हात.

॥ दिंडी ॥

भला माझा तूं हंस गडो राया ॥
विरहदुस्तर-विस्तार निस्तराया ॥
चित्त नेघे मज तूज जा ह्मणाया ॥
तेंचि[1] वाहन तरि तूं करीं फिराया ॥ ८० ॥
असें बोलोनी नळें रंजवीला ॥
अंजुळीमाजी हंस बैसवीला ॥
गमे चंपक-कुसुमौघ हार झेला ॥
पाठवाया युवतीस सिद्ध केला ॥ ८१ ॥
त्वरित पुनरागम असो तुझा एथें ॥
झेंप घालीं सुखरूप गगन-पंथें ॥
नको विसरूं आह्मांसि असों एथें ॥
वदुनि धरि जे गहिंवरा मही-नाथें ॥ ८२ ॥
बेंर येतों ह्मणऊनि हंस बोले ॥
उडुनि जातां बहु शकुन तया झाले ॥
पवन-चंचल मधु-बिंदु-मुखीं आले ॥
वाम-भागीं उभयतां गरुड गेले ॥ ८३ ॥
उडत होते खग वायसादि[2] जाणा ॥
तयां भासे तैं हंस तो ससाणा ॥
नभा मानुनि कीं निकष-पाषाणा[3] ॥
स्वर्ण-रेखा तें तेज मनीं आणा ॥ ८४ ॥
असा वेगें तो नभामाजि धांवे ॥
तया वैदर्भी देशि क्षणी पावे ॥

---

१ चित्त. २ कावळे. ३ कसोटीचा दगड.

तेथ कुंडिन-नगरासमीप धांवे ॥
राज-मंदीरीं गोपुरीं विसावे ॥ ८५ ॥

॥ मालिनी ॥

खग मग नगरीचे गोपुरीं[1] झेंप घाली ॥
मृदु-पवन-गवाक्षीं बैसतां झोंप आली ॥
तदुपरि जवें[2]-शाली वेंघला चंद्रशाला[3] ॥
निरखि वितत[4]-शाला राजधानी विशाला ॥ ८६ ॥

॥ चूर्णिका ॥

सकल-भुवन-ललामायमानो[5] ॥
माना[6]धिक-विभव-धनिक-सदन-शत-विराजमाना ॥
कलश-जनित-मुनि[7] चकित-जल-धि शरणाति-
विस्तृत-परि[8]खांतरीपा[9]यमाना ॥
चंद्रशाला-विजित-सुर-विमाना ॥
जिचे सौध[10] गगन-मंडपाधार-स्तंभाचि माना ॥
लाविति ते जल-दा निज माना ॥
वासव-चाप[11] जयांस कमाना ॥
ऐसी कुंडिन-नामधेय नगरी राजहंसें पाहिली ॥ १ ॥

॥ वसंततिलका ॥

कोणी वणिग्-जन विकी तुळितां तराजे ॥
कस्तूरिका तिजसवें अलिनी[12] विराजे ॥

---

१ राजवाड्याच्या दरवाजावर बांधलेली उंच इमारत. २ वेगानें. ३ सर्वांत उंच माडी. ४ विस्तीर्ण वाडे असलेली. ५ भूषणभूत. ६ अगणित. ७ अगस्ति ऋषि. ८ खंदकांत. ९ बेटाप्रमाणें असलेली. १० वाडे. ११ इंद्रधनुष्याकार. १२ भ्रमरी

दोन्ही समान निरखी विकणार देतो ॥
घेणार तो न समजोनि उगाच घेतो ॥ ८७ ॥
तेणें तसें नगर तें धरितां निडारी[1] ॥
तेथें विलास-वन एक दिसे पुढारीं ॥
जेथें सुशीतळ मही-तळ सांद्र-साई[2] ॥
जाई जुई फुल-मयी बहु आंब-राई ॥ ८८ ॥

॥ पद ॥

तया वनीं खेळे भूप-सुता ॥ धृ० ॥
खेळविता बहु मेळविला सखि-मेळ तयासहिता ॥ १ ॥
राजस ते द्विज-राजमुखी गजराज-गती ललिता ॥ २ ॥
ध्यात असे नळराज-कथा रघुनाथ-कवींद्र नुता ॥ ३ ॥

॥ वसंततिलका ॥

तो मंडळाकृति फिरे उतरावयाला ॥
भैमी-मुखेंदु-परिवेष ह्मणों तयाला ॥
तेथें महीवरी असा खग बैसताहे ॥
कीं सुंदरी निज कुतूहल जेविं पाहे ॥ ८९ ॥
जो बैसतां चपळ पक्ष-पुटीं धरेला[3] ॥
हाणीतसे फडफडां ध्वनि हो उदेला ॥
पाहे तया खग—वरासि वरानना हे ॥
मानी मनीं नवलही मग बोलताहे ॥ ९० ॥

॥ शिखरिणी. ॥

असा पक्षी लक्षी बहु—विहग—लक्षीं न मिळता ॥

---

१ दृष्टीपुढें. २ दाट झाडी. ३ पृथ्वी.

सुवर्णी जो वर्णी वद कवण वर्णी कवयिता ॥
अगाई हा बाई त्वरित वरि जाईल पळुनी ॥
धरूं जातें हातें हळुहळु तयातें न कळुनी ॥ ९१ ॥

॥ वसंततिलका ॥

ऐसें वदे मग तयास धरावया हे ॥
तैं होय हंस-गमनी[१] पैहिलीच आहे ॥
वाजेच ना वलय नूपुर-नाद नोहें ॥
तो तद्गतीस निरखूनि कसा न मोहे ॥ ९२ ॥
हे मंद-मंद-पद सुंदर कुंद-दंती ॥
चाले जसा मद-धुरंधर इंद्र[२]-दंती ॥
हंसा धरूं जवळि जाय कृशोदरी ते ॥
निष्कं[३]-कंकण-करासि पुढें करीते ॥ ९३ ॥

॥ द्रुतविलंबित ॥

गवसलाच असा खग भासला ॥
तंव तदीय सखी-जन हांसला ॥
मग सर्वेच बुझावुनि हांकिला ॥
उडविलाचि पिटाळुनि टाकिला ॥ ९४ ॥

॥ वसंततिलका ॥

कांहीं उडोनि गगनीं मग नीट येतो ॥
नाहींच दूर न समीप बसे तसा तो ॥
पाहे सुधाकर[४]-मुखी कलहंस-राया ॥
लाहे मनोरथ तयास पुन्हां धराया ॥ ९५ ॥

---

१ ( स्वतः ) हंसाप्रमाणें हळू चालणारी. २ ऐरावत ( हत्ती )
३ कांकणें वाजूं नयेत ह्मणून हात न हालवितां ४ दमयंती.

॥ सवाई ॥

हंस धरीन ह्मणोनि मनोरथ हा मज होय विनोद तुह्मांला ॥
हा कलहंस पिटाळवितांहि, पुन्हां उडवाल तया विहगाळा ॥
जा परत्याच, तुह्मी नलगेच, असें वदुनी नृप-राज-सुता ते ॥
राहविला सखिचा जन आपण-मात्र तयास धरूं मग जाते ॥

॥ वसंततिलका ॥

रागेंजली[1] अरुणं[2]-कांति विराजविते ॥
हे एकली सुतनु चंद्रकला तसी ते ॥
गेली हळूच कलहंस समीप केला ॥
कांहीं पुढें फडकला अवलोकिजेला ॥ ९७ ॥
आणीकही पद न वाजत मंद चाले ॥
जो चालतां पदर सांवरिला न हाले ॥
हेही करी निजकरीं खग सांपडेसा ॥
तोही हळू हळुच होय पलीकडेसा ॥ ९८ ॥

॥ मालिनी ॥

मद-गज-गमनेनें मागुती चाल केली ॥
विनंत[3]-तनु-लता हे तत्समीपास गेली ॥
पुनरपि फडके तो फारसा दूर नाहीं ॥
जवळि जवळि ऐसा भासला हंस कांहीं ९९ ॥

॥ वसंततिलका ॥

हंसें तदा चतुर-संमत युक्ति केली ॥
ते चालवीत सु—तनु बहु दूर नेली ॥

---

१ रागावली असतां. २ रक्तवर्ण. ३ नम्र.

छाया तियेशि दुसरी तिसरी वनाळी ॥
जे सांवळी युवतितुल्य दिसे निराळी ॥ १०० ॥

॥ प्रमाणिका ॥

तया वनांत एकली ॥ विलासिनी विलोकिली ॥
मदें भरोनि डोलतो ॥ तियेसि हंस बोलतो ॥ १ ॥

॥ दिंडी ॥

भूमि-भागीं फिरणार तूं तुला मी ॥
कसा सांपडेन सांग गगन-गामी ॥
बाळ, बाळे, जरि होय चंद्र-कामी ॥
हस्त त्याचा लागेल काय सोमीं ॥ २ ॥
कसें नांदे तारुण्य तुझ्या देहीं ॥
बाल्य गेलें तें नेणसीच कांहीं ॥
उगवतांही सहस्र-भानु पाहीं ॥
काय नलिनी-संकोच जात नाहीं ॥ ३ ॥
असो, सांपडतों तुज्या करामाजी ॥
पुन्हां सुटका करिशीच काय माझी ॥
कसा पांतेजूं बाळ-बुद्धि तूझी ॥
स्त्री-स्वभावें बहु आणशील बाजी ॥ ४ ॥

॥ आर्यागीति ॥

पाषाणरूप होतें, भ्रमवि तयातें धरूनि तद्देहातें ॥
जीवंतही गवसला, समज तियेचे गृहींच तो मग वसला ॥

---

१ (सोबतीला) तिचीच पडछाया २ झाडांची रांग. ३ चंद्रप्राप्तीची इच्छा करणारें, ४ कमळ. ५ विश्वास धरूं ६ संकट.

॥ मालिनी ॥

चतुर नर जसा हा बोलतो हंस तैसा ॥
तरि न धरि मृगाक्षी विस्मयीं भाव कैसा ॥
पळुनि तिज निखंदी[1] तीस तो खेद नाहीं ॥
शिणहि विसरली ते बोलती होय कांहीं ॥ ६ ॥

॥ दिंडी ॥

कोण तूं गा कोठील कवणियाचा ॥
कसा झाला तव देह सोनियाचा ॥
कशी आली ही तूज मनुज-वाचा ॥
काय भाग्योदय सांगु या वनाचा ॥ ७ ॥
धरिल पाहिल सोडील असा पाहीं ॥
मजवरता विश्वास तुझा नाहीं ॥
असो, पुसतें ते सांग कथा कांहीं ॥
जाइं अथवा मग याच वनीं राहीं ॥ ८ ॥
असें बोलोनी मौन धरुनि राहे ॥
काय बोले तो हंस असें पाहे ॥
तदा त्याचा वचनौघ असा वाहे ॥
राज-कन्ये तूं आयके गिरा[2] हे ॥ ९ ॥
ब्रह्मदेवाचे बहु विमान-वाही ॥
हंस आहेती ऐकिलें तुवांहि ॥
तया वंशीं सौवर्ण-देह हाही ॥
ज्या-समान सखि सर्वमान्य नाहीं ॥ ११० ॥

---

१ झिटकारी. २ भाषण.

॥ वसंततिलका ॥

मंदाकिनीमधिल जीं कनकारविंदें ॥
तीं जेवितों मृदुल-नाल-मृणाल-कंदें ॥
आह्मी असों नृपसुते तरि कांचनाचे ॥
जों कार्य तें धरिल कीं गुण कारणाचे ॥ ११ ॥

जो मानसीं विहरतो विहरो परी तो ॥
कां आमुची कुळ-सती अ.सती करीतो ॥
राखीं नळा निज-यशोमय-हंस राया ॥
आलों महीवर फिराद अशी कराया ॥ १२ ॥

मी गुंतलों नळ-महींद्र-गुणौघ-पाशीं ॥
सेवेसही मग करोनि तयाच-पाशीं ॥
आलोकुनी कवण या चतुरा न नाचे ॥
लोकेशता विभवेही चतुराननाचे ॥ १३ ॥

गंगोदकीं घडिघडीस बुडीस देतों ॥
पंखांसि शीतळ करोनि तसाच येतों ॥
तेणें नळासि करितों मग वीजनातें ॥
बाळे तसा न धरितो सुरत-श्रमातें ॥ १४ ॥

एकांत लेखनहि वाचनही करीतो ॥
माझी तनु-द्युति समीप तदा धरितो ॥

---

१ भागीरथी. २ सुवर्णकमळें ३ कमळाचा कोंवळा देंठ. ४ ह्मगन. ५ मानस सरोवरांत. ६ कुळाची कीर्ति. ७ खोटी. ८ नळाचा यशोमय हंस मानस सरोवरीं क्रीडा करो, पण तो शुभ्र असल्यामुळें आह्मीही शुभ्र होतों ह्मणून आह्मीं सुवर्णकांतीचे असल्याची कीर्ति नाहींशी होते, यास्तव नळा आपला यशोमय हंस जवळ ठेव, अशी फिर्याद करावी ह्मणून पृथ्वीवर आलो. ९ ऐश्वर्य. १० हंसाच्या पंखांबद्दल. ११ पंख्याप्रमाणें.

याकारणें नळ मला बहु आप्त मानी ॥
तो सांगता निज-मनोरथ होय कानीं ॥ ११५ ॥
आधींच नैषध-कथा नवनीत-भेलां[1] ॥
होता अलंकरण-रूप इच्या जिभेला ॥
हंसोदयें[2] विघरतां[3] अधरीं धरी ते ॥
स्वीकारितां वचन तें मग आदरीते ॥ १६ ॥

॥ दिंडी ॥

नळें तुजशीं एकांत काय केला ॥
तोचि ऐकाया जीव हा भुकेला ॥
तया बोलोनी निववि या भुकेला ॥
ऐकवावा मज ह्मणुनि नोयिकेला[4] ॥ १७ ॥
नळाशीं जो एकांत तुझा तो कां ॥
प्रकट कीजे म्यां सांग इतर लोकां ॥
धन्य डोळे न करोनि तदालोका ॥
नळकथेनें हे कर्ण धन्य हो कां[5] ॥ १८ ॥
निषधराजीं हे फार दिसे राजी ॥
असें हंसें जाणोनि मनामाजी ॥
बोलिजेली नळ-राज-कथा हे जी ॥
भला हेजींचे[6] तीशि ह्मणे हे जी ॥ १९ ॥
नळ ह्मणाला मज सहज धरुनि बाहीं ॥
तुला कोठेंही बंद अटक नाहीं ॥

---

१ लोण्याचा गोळा. २ हंसाच्या येण्यानें. ३ वितळतां. ४ न ऐकिलेला. ५ होईनात कां. ६ दूत.

सकळ भुवनें तरि फिरुनि राज–गेहीं ॥
एक नवरी मज योग्य वरी पाहीं ॥ १२० ॥

॥ वसंततिलका ॥

एकांत हाच वदला मज जाण बाळे ॥
तूं सांग तो वर तुला रुचला रसाळे ॥
एणेपरी परिसतांच तया अनन्यां[1] ॥
ते बोलते चतुर सुंदर राज-कन्या ॥ २१ ॥
मी जाण देवनळहीं[2] स्व-करीं धराया ॥
सांगेन काय चतुरा मज लाज जाय! ॥
काळें करूनि[3] सुख जोंवरी होय लेखीं ॥
हें बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी ॥ २२ ॥

॥ स्रग्विणी ॥

श्लेष-शब्दें इणें भाव सांगीतला ॥
नैषधाधीश तो नाथ मागीतला ॥
होय जाणीयली, घे त्रपा[4]-कंचुला ॥
हंस बोलावया हालवी चंचुला ॥ २३ ॥
गांठ्याळ जें हृदय सांद्र[5] न होय ज्याचें ॥
नामेंचि देवनळ कार्य नसे तयाचें ॥
धत्तूर[6] हा कनक-नाम सदा धरीतो ॥
होईल काय रसिका कनकापरी तो ॥ २४ ॥

---

१ एकटयाला. २ लेखणी. ३ कांहीं कालानें. ( या श्लोकाचा अर्थ एकच परंतु अनेक तऱ्हेनें होतो, तथापि तात्पर्य:–लाजेमुळें स्पष्ट सांगतां येत नाहीं पण मनांतून नळच इष्ट आहे असें दर्शवितें.)
४ लज्जारूप चिलखत. ५ कोमल. ६ धोतरा.

ती बोलते युवति, लाज मनीं दडाली ॥
होती, तुवां विचरतां मन ती उडाली ॥
आतां वरूं नळवरासि तुला नवाजूं ॥
गाऊं तुझी स्तुति करूनि कशास लाजूं ॥ १२५ ॥

॥ मालिनी ॥

परिसुनि वच ऐसें जें इणें बोलिजेलें ॥
पतग[1]-कुल-वतंसें अंतरीं ध्याइजेलें ॥
परवश-हृदया हें नैषधें राजहंसें ॥
ह्मणुनि समजतां हें बोलिजे राजहंसें ॥ २६ ॥

॥ दिंडी ॥

जशी रंजलि आहेस निषध-भूपीं ॥
तसा तोही रंजला तुझ्या रूपीं ॥
दैव-घटनें अन्योन्य व्हाल सोपीं ॥
तुह्मी नांदालहि सत्य हें निरोपीं ॥ २७ ॥
कोण योजावी नोवरी नळाला ॥
ब्रह्मदेवानें हा विचार केला ॥
तुझा नामाक्षर-मंत्र घेइजेला ॥
असें भासतसे माझिया मनाला ॥ २८ ॥

॥ मालिनी ॥

नळ-रहित वराशीं तूज योजूनि पाहे[2] ॥
तरि मग विधि ऐसा कोण तो मूढ आहे ॥
अ-चतुर नर तोही जाहल्यां जेवितां[3] कीं ॥
सळमिसळ करीना सर्वथा क्षीर-ताकीं ॥ २९ ॥

---

१ पक्षीकुलभूषणानें (हंसानें). २ योजूं पाहील. ३ जेवतांना.

॥ दिंडी ॥

कशाला हें बोलणें काय एणें ॥
तुवां वरिला नळ-राज तूंहि तेणें ॥
सफळ माझें हें एथवरी येणें ॥
राजकन्ये नीरोप मला देणें ॥ १३० ॥
चतुर सुंदर तो तरुण निषध-राजा ॥
तुवां राजी केलाच तूं घरा जा ॥
धन्य वैदर्भी दैव—योग तूझा ॥
बोल मानीं सत्यार्थ मनीं माझा ॥ ३१ ॥
असें जाउनि तूं बोल राजहंसा ॥
तुझी दासी जाहलें राजे[1]—हंसा ॥
नको चिंता तूं करूं अरि-ध्वंसा ॥
ऐक शुभ्रांशू—वंशेजावतंसा[2] ॥ ३२ ॥
नको पाहूं तूं नोवरी नळाशीं ॥
मीच भावें होईन सत्य दासी ॥
जरी यावें आतांचि तया पाशीं ॥
गोष्ट भासे विपरीत लौकिकाशी ॥ ३३ ॥

॥ मालिनी ॥

करुनि मज रवाना राजसे तूजसाठीं ॥
नृपति निरखि माझी वाट आरामें[3]—वाटीं ॥
बसवुनि निज-पाठीं तूज नेईन तेथें ॥
परि चुकुर तुझे हे लोक होतील एथें ॥ ३४ ॥

१ नळा. २ चंद्रवंशभूषणा ( नळा ). ३ बागेत.

॥ वसंततिलका ॥

येरीकडे नृपति धाडुनि राजहंसा ॥
तो बैसला करित आपण तत्प्रशंसा ॥
येईल शीघ्र घटना करुनी तियेची ॥
होईल भेटि मज आज तये प्रियेची ॥१३५ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

आरामीं विरहोत्करें[1] तरु-तलीं थारा करोनी स्वयें ॥
वारा घेत बसे तपे तपनसा[2] तारापती[3] निश्चयें ॥
मारांचा[4]-शर-मार नावरि ह्मणे दारा घडे ती कशी ॥
हा राजीव-दलाक्ष[5], माधव, जनोद्धारा कृपा हो अशी ॥३६॥
तों चिन्हें शुभ पाहुनी नृप ह्मणे लाभेल लाभावळी ॥
आला सन्मुख राजहंस निरखी, बाहू-युगें आंवळी ॥
बोले मंजुळ वाक्य एथ बसलों त्वद्ध्यान लावूनि रे ॥
झालें वृत्त समग्र सांगुनि करीं हंसा समाधान रे ॥ ३७ ॥

॥ दिंडी ॥

काय वदली तुजसवें हंसराया ॥
मान्य झाली कीं ती मला वराया ॥
कधीं भेटे ती निज-करीं धराया ॥
विरह-बाधा मज नये आंवराया ॥ ३८ ॥
हंस बोले नृपराज सुगुण-सारा ॥
माळ घालीते ती तुला उदारा ॥
तुझ्या ध्यानीं सलग्न जे विचारा ॥
सत्य मानीं ती होय तुझी दारा[6] ॥ ३९ ॥

---

१ विरहातिशयामुळें. २ सूर्याप्रमाणें. ३ चंद्र. ४ मदनाचा. ५ कमलनेत्रा. ६ स्त्री.

जाइं नगरा तूं नृपा कृपाराशी ॥
पत्र येतांची जा स्वयंवरासी ॥
स्वयें ये ते चालूनि मंदिराशी ॥
फार वदणें नलगे सुखोत्करासी ॥ १४०
बरें येतों बोलोनि पाय हातें ॥
नमुनि चाले सप्रेम तो गृहातें ॥
नृप निघे तैं सह-चमू निज-पुरातें ॥
हंस-वचनीं लावुनी अंतरातें ॥ ४१ ॥
जनक-तनयेशीं[1] पवन-तनयसा[2] तो ॥
वदुनि वेगीं उड्डाण नभीं घेतो ॥
नळापाशीं वृत्तांत निवेदी तो ॥
स्व-धामातें पावोनि सुखी होतो ॥ ४२ ॥
असो ऐशी हे कथा सौरसाची[3] ॥
श्रवण करितां बहु गोड गमे साची ॥
धन्य लीला त्या ऐक नैषधाची ॥
प्रकटवाणी रघुनाथ-पंडिताची ॥ ४३ ॥
असो आल्या इजजवळि सख्या ऐशा ॥
बोलती त्या मग तीस सकळ कैशा ॥
हंस धरुनी परिपूर्ण तुझी आशा ॥
काय गेला तो उडुनि गगन-देशा ॥ ४४ ॥

॥ मालिनी ॥

धरुनि कर सखींनीं सौधं-शालेंत[4] नेली ॥
खग-वचन-मधूनें जे मनीं मोहिजेली ॥

---

१ सीता. २ मारुती. ३ रसभरित. ४ राजवाड्यांत.

नल-विरह-भरानें पोळली गुप्तरूपें ॥
नवल कनकशी ते गौरही तप्तरूपें ॥ १४५ ॥

॥ वसंततिलका ॥

होणार जो वर तदीय वियोग दोंही[1] ॥
सांगावयासहि न ये लपवावयाही ॥
या सांगवी मदन लाज न सांगवीतें ॥
कीं या दुहींत[2] शिणलें मन रंगवीतें ॥ ४६ ॥

॥ शिखरिणी ॥

न रंजे, कारंजें निरखुनि, फणीतें[3] फणफणी[4] ॥
मुदनें[5] मोदेना, नल-गुण-गणीं जे गुणगुणी[6] ॥
न बैसे जे सेजवरि, न परिसे जे शुक-गिरा ॥
न नाहे[7], मानी[8] हे न धरि ललना हेतु दुसरा॥४७॥

॥ वसंततिलका ॥

लज्जावती युवति हे वडिलांसि धांके[9] ॥
झांकीतसे विरह[10]-पावक तो न झांके ॥
जो पंजरीं[11] लपविला वसनांतराळीं ॥
तो झांकिला गगन[12]-दीप तरी झळाळी ॥४८॥
तीचे मनीं नळ मनोभव[13]वीर होते ॥
होतां तयांशि कथिलें जथिलें अहो ते ।
त्यांहीं-च ते दुखविली सुतनू निजेली ॥
मूर्च्छावती निज-जनीं अवलोकिजेली ॥ ४९॥

---

१ जाळी. २ विकल्प. ३ विंचरण्याच्या फणीला. ४ त्रासे. ५ आनंद होईना ६ गुणगुण करी. [ दमयंतीच्या स्थितीचें वर्णन ]. ७ स्नान न करी. ८ समजा. ९ भिते. १० विरहाग्नि. ११ पिंजऱ्यांत. १२ सूर्य. १३ मदन.

॥ मालिनी ॥

गजबज बहु झाली माय धांवोनि आली ॥
धरुनि हृदय-देशीं तीजला सेज केली ॥
करिति विझण-वारे त्या सख्या वेगळाल्या ॥
वडिल वडिल दाया जाणत्याही मिळाल्या ।१५०॥

॥ गीति ॥

ते शीतळोपचारीं जागी झाली हळूच मग बोले ॥
औषध नलगे मजला परिसुनि जननी बरें ह्मणुनि डोले ५१

॥ दिंडी ॥

मूल उप-वर हे जाहली इयेला ॥
पाहिजे कीं वर योग्य पाहिजेला ॥
असें एकोनि वधूचिया बोला ॥
सैंवराचा मग यत्न नृपें केला ॥ ५२ ॥
नगर सारें शृंगारविलें तैसें ॥
भूमि-लोकीं वैकुंठ दिसे जैसें ॥
लिखित पाठविलें सकळ नृपां कैसें ॥
तुह्मीं यावें जी सैंवरासि ऐसें ॥ ५३ ॥
निषध-राजासी लिखित पाठवी तो ॥
प्रति-द्वीपीं भूपतिसही लिहीतो ॥
अशा यत्नीं लागला नृप अहो तो ॥
पुढें परिसा वृत्तांत कसा होतो ॥ ५४ ॥
ऋषी नारद असतां नभो-विहारीं ॥
वैजयंती ज्या दिसे मनोहारी ॥
मणी रमणीय कनक-कलश भारी ॥
सुरपतीचा जो सौध महा भारी ॥ १५५ ॥

---

१ भीम राजानें आपल्या बायकोचे.

तया प्रासादीं जाय ऋषी पाहे ॥
सभा केली देवेंद्र बैसलाहे ॥
फार आदरिलें तया देव-रायें ॥
अर्घ्य-पाद्यादिक करुनि विनत-कायें ॥ ५६ ॥

॥ भुजंगप्रयात ॥

समुद्रोभ्द्वा अप्सरा साठ कोटी ॥
जयांची द्युती[1] ते रतीलाहि लोटी ॥
विधीनें तशा त्या तुकूं पाहिजेल्या ॥
ज़ियेशीं हंकू[2] जाहल्या उंच गेल्या ॥ ५७ ॥

॥ मालिनी ॥

उपवर दमयंती जाहली नोवरी ते ॥
कवण वर कळेना हें जयांतें वरी ते ॥
दृढतर-निजलज्जा गव्हरीं[3] गुप्त केला ॥
जिवलगाहि सखीला जो नसे सांगिजेला ॥५८॥

॥ दिंडी ॥

नवे तरणे नृप-मुख्य तीजसाठीं ॥
मोहिले ते करिताति यत्न कोटी ॥
कळह-वार्ता ही मानिताति पोटीं ॥
तया युवतीची आस तयां मोठी ॥ ५९॥
असें नारद बोलोनि तो निघाला ॥
जाय हृदयासी मानल्या स्थळाला ॥
थोर चिंता मग होय सुरेंद्राला ॥
ह्मणे कैसी ते वरिल आपणाला ॥ ६० ॥

---

१ कांति. २ हलक्या. ३ गुहेंत.

वरुण, पावक, यम, इंद्र हे मिळाले ॥
असे चौघेही रथारूढ झाले ॥
मही-लोकासी यावया निघाले ॥
तया कुंडिन-नगरासमीप आले ॥ ६१ ॥

॥ द्रुतविलंबित ॥

तंव तया चवघांस तया पथीं ॥
निषध-नायक येत दिसे रथीं ॥
तरुण सुंदर जो चतुराग्रणी ॥
अतुल वैभव राज--शिरोमणी ॥ ६२

॥ मालिनी ॥

निरखुनि निषधेंद्रा[1] इंद्र तो बोलताहे ॥
युवति उभयताही लभ्य आम्हांसि नोहे ॥
वरिल जरि नळाला ते तया लाभली जे ॥
न वरि तरि, आह्मांसी मूढ[2] ते काय कीजे ॥ ६३ ॥

॥ शिखरिणी ॥

नळातें पाचारी सुरपति विचारी कुशल तो ॥
म्हणे आह्मांपाशीं तव गुरु[3] विलासी निवसतो ॥
खुणा ज्या ज्या त्याच्या तुजजवळि त्या त्या निरखितों
खरा तूं तद्वंशी ह्मणउनि तदंशी समजतों ॥ ६४ ॥

॥ वसंततिलका ॥

तो वन्हि तो वरुण तो यम इंद्र गा मी ॥
झालों तुला सकळ हे विदित स्व-नामीं ॥
बोले महीरमण हा नळ चंद्रवंशी ॥
वंदी पदास तुमच्या तुमचाच अंशी[4] ॥ १६५ ॥

---

१ नळ. २ मूर्ख. ३ पिता वीरसेन. ४ राजा हा अष्टलोकपाळांचा अंश असतो, असें मनूचें एक वचन आहे.

॥ दिंडी ॥

नळा कोठें जातोसि असें बोले ॥
नळें इंद्रासी असें बोलिजेलें ॥
भीमभूपें हें लिखित पाठवीलें ॥
सैंवरालागीं येइजे वहीलें[1] ॥ १६ ॥
बोलताहे देवेंद्र नृपवराला ॥
नैषधा तूं आलासि सैंवराला ॥
समज आह्मी तुजजवळि याचनेला ॥
करूं आलों मनिं धरुनि कामनेला ॥ १७ ॥

॥ वसंततिलका ॥

जे हे दिशापति[2], विशाल[3]—यशा, अशांला ॥
आशीं[4]—वशा कु[5]-वलयांत—दृशी[6] कशाला ॥
हा बोल तूं न वद, तूजसमीप येतों ॥
आम्ही मखीं निजमुखीं अवदान घेतों ॥ १८ ॥
केला विचार हृदयीं नळराज यानें ॥
हा जीवही धनहि देइन निश्चयानें ॥
देवेंद्र दे जरि म्हणेल कदापि भैमी[7] ॥
ते देववेल मज काय? करीन गैं[8] मी ॥ १९ ॥

॥ दिंडी ॥

म्हणे राजेंद्र तया देव-देवा ॥
काय आज्ञा जी काय करूं सेवा ॥
वीरसेनाचा थोर पुण्यठेवा ॥
मज मिळाला तो दर्शनाख्य मेवा ॥ १७० ॥

---

१ त्वरित. २ दिक्पाल. ३ ( नळास उद्देशून ). ४ आशाबद्ध. ५. पृथ्वींतील. ६ ( पदार्थांवरील ) दृष्टी. ७ दमयंती. ८ कानाडोळा.

॥ वसंततिलका ॥

बोले सुराधिप नराधि-पतीस राया ॥
भैमी जसी मज वरील तसें कराया ॥
बोलावयास तिजशीं तिचिया घरा जा॥
तूं बोलका चतुर केवळ होस राजा ॥ ७१ ॥

॥ मालिनी ॥

मग हळुच सुरेंद्रा बोलिजे भूपतीनें ॥
मज निर्ज-सु-मनाची घातली माळ तीनें ॥
हृदय तरि तियेचें सांद्र झालें सुवासें ॥
चलित न करवे तें कोणत्याही प्रयासें ॥ ७२ ॥

॥ दिंडी ॥

पुन्हां बोले देवेंद्र नृपवरा या ॥
तुला झाळें वश हृदय तिचें राया ॥
तरिच आलों हे याचना कराया ॥
तुझ्या वाक्यें आम्हांसि ते वराया ॥ ७३ ॥

॥ वसंततिलका ॥

दातॅव्यही स्ववश आपण जाणताही ॥
पर्याय उत्तर वदेच न देच कांहीं ॥
दाता असा शठ कसा ठकसा कदापी ॥
जो याचकावरि दया न करीच पापी ॥ ७४ ॥

॥ मालिनी ॥

गहिंवरत गळाही चावळे जीभ वाळे ॥
विकळपण शरीरीं कंपही या निराळे ॥

---

१ आपल्या शुद्ध मनाची. २ माझ्या दातव्यामुळें. ३ जें याव-काचें तें.

धनिक विमुख होतां अंतरीं शोक राहे ॥
हर हर मज भासे यातना याचना हे ॥ १७५ ॥

॥ वसंततिलका ॥

भांबावला धन-मदें भलतेंच बोले ॥
तो बोलही स-रस मानुनि लोक डोले ॥
मासें करूनि फुगला गळे[2]-साच भावे[3] ॥
ज्या दीन मीन धरितां वळसाच पावे ॥ ७६ ॥

॥ दिंडी ॥

असे परिसोनी बोल वासवाचे ॥
तया नळराजा काय वदे वाचें ॥
तुम्ही ज्ञाते हो थोर थोर साचे ॥
असां साक्षी तुह्मि माझिया मनाचे ॥ ७७ ॥
ज्यासि जेथें सामर्थ्य नसे त्यातें ॥
कसें कार्या त्या तुम्हीं सांगिजेतें ॥
बाळ तान्हें उचलील काय जातें ॥
बोलणाराचें मोल फोल जातें ॥ ७८ ॥
सात बंकांही[6] पलीकडे हो ते ॥
राजकन्येची भेट कशी होते ॥
त्यजुनि राज्य त्वद्गता कशी ते ॥
धरावी म्यां हृदयासि जे कशीते ॥ ७९ ॥

॥ वसंततिलका ॥

बोले सुरेंद्र नृप-सौध सुखें फिराया ॥
आकार गुप्त वर देइन देव-राया ॥

---

१ या वाक्यांत अध्याहृत कर्ता 'धनिक' २ मासे पकडण्याचा गळ. ३ वाटतो. ४ इंद्राचे ५ योग्यता राहत नाहीं. ६ चौक्या. ७ त्रास देतें.

जाई विदर्भ-वसुधेस सुतेस शोधीं ॥
आम्हांसि ते तरि वरील तुझ्याच बोधीं ॥ १८०

॥ ओंव्या ॥

इंद्र त्रैलोक्य नायक ॥ तोही झालासे याचक ॥
दाक्षिण्यानें भूपाळक ॥ यांच्या वाक्यें गुंतला ॥८१ ॥
बरें म्हणोनी उत्तरें ॥ रथावरोनि उतरे ॥
तया राजपुरीं शिरे ॥ शोभा तेथील पाहतो ॥ ८२ ॥

॥ वसंततिलक ॥

तो जाहला नृपवर स्थिर दूतभावीं ॥
मानीचना युवतिच्या विरहास भावी ॥
कुंभोद्भवें तरि महोदधि-पान केलें ॥
दुर्वार वाडवशिखेस न मानिजेलें ॥ ८३ ॥
प्राणापरीच हृदयीं, नगरांतरीं तो ॥
गुप्त स्वरूप नल-भूप तदा धरीतो ॥
बंकीं रिघे तंव तया दिसताति बंके ॥
पंकेरुहास्य न दिसेची, तया न शंके ॥ ८४ ॥

॥ ओंव्या ॥

तया राज-सौधांतरीं ॥ शोभा पाहे परोपरी ॥
कोठें आहे ते सुंदरी ॥ धुंडावया लागला ॥ १८५ ॥
कोणी एक दोघी दूती ॥ तेथें अन्योन्य बोलती ॥
एथें आहे दमयंती ॥ जाई बोलोनि येई ॥ ८६ ॥
तिजसवें सौधांतरीं ॥ राजा जाय अंतःपुरीं ॥
तेथें देखिली सुंदरी ॥ जैसा पूर्ण चंद्रमा ॥ ८७ ॥

१ कुंडिनपुरीस. २ नळ.

सुमेन-सेजेच्या पलंगीं ॥ बैसलीसे तन्वंगी ॥
सख्या खेळताती संगीं ॥ बहु अप्सरा त्या जैशा ॥ ८८ ॥

॥ मालिनी ॥

प्रगट तिज-पुढारां जाहला राजमौळी ॥
पदर वरि न घेतां हार जैसा झळाळी ॥
निज-हृदय निवासी काय बाहीर आला ॥
निरखुनि दमयंती तेविं मानी तयाला ॥ ८९ ॥

॥ द्रुतविलंबित ॥

गजबनोनि समस्त तिच्या सख्या ॥
गज-गमा उठल्या तिजसारख्या ॥
पदर सांवरितां नृप-बालिका ॥
झळकती हृदयीं मणि-मालिका ॥ १९० ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

कोणी एक सखी विलोकुनि नळ-क्षोणीश्वरा मोहिली ॥
कोणी तत्तनु-कांति-सिंधु-पतित द्रोणीपरी पोंहली ॥
कोणी हा मजला न नाथ म्हणुनी लोणी तशी पाझरे ॥
कोणी एक तयास लाजुनि विरे कोणी वियोगें झुरे ॥
रामातें जनक-क्षमा-पति-सुता, रामीं जशी रेवती ॥
कामारीस नगाधि-राज-तनयीं कामासि जैशी रती ॥
या मानूनि तशी विदर्भ-दुहिता रामा मनीं भाविते ॥
हा माझा हृदयाब्ज-सूर्य ह्मणुनी त्या मानिनी बोलते ॥

॥ साकी ॥

कोण तुह्मी कवणाचे कोठुनि एथें कां आला हो ॥

१ पुष्पशय्या. २ भूपति. ३ होडी. ४ बळरामास. ५ शंकरास. ६ पार्वती.

काय निमित्तें दिधला मजला हा निज-दर्शन-लाहो[1] ॥
अटक न केली तुम्हांसि येतां त्या सातांही बंकीं[2] ॥
हीं माझ्या नयनांचीं सुकृतें विशेष मी हें शंकीं ॥
संभवला कवणाचे वंशीं सांगा हो अ-कलंकी ॥
उभे असां कां भागतसां हो या बैसा पर्यंकीं ॥ ९३ ॥

॥ वसंततिलका ॥

राजे असाल तरि धन्य वसुंधरा हे ॥
शोभाल देव तरि नाक यथार्थ आहे ॥
भोगी तुम्ही उपजलां जरि नाग-लोकीं ॥
खालीं असोनि सकळांवरि होय तो कीं ॥ ९४ ॥

॥ साकी ॥

दुग्धपूर नसतां निजरूपीं क्षीर-सिंधु तो जैसा ॥
वसंत आला नाहीं तरि तो उद्यान-भाग जैसा ॥
अमृत-कराचा उदय न होतां रजनी-समयो जैसा ॥
तुमच्या विरहें आजि जाहला कवण देश तो ऐसा ॥ ९५

॥ वसंततिलका ॥

भूपाळ जो मम मनो-मुकुरीं[3] उभासे[4] ॥
तो नैषधेंद्र तुमचा अनुबिंब भासे ॥
रूपें तशींच दिसताति दिगंतराळीं ॥
तीं हीं कशीं म्हणवतील तुम्हां-निराळीं ॥ ९६ ॥

॥ साकी ॥

स-रस-द्युति-पद फुल शिरसांचें फुललें मृदु स्वभावें ॥
चालवाल किति दूर तयातें अदय हृदय मज भावे ॥

---

१ लाभ. २ पहाऱ्यांतून. ३ मनरूपी आरशांत. ४ दिसे.

कर्णयुगुल हें धन्य करावें सांगुनियां निज नांवे ॥
स्तवन करी रघुनाथ तयांचें कवन स्वीकारावें ॥ ९७ ॥

॥ मालिनी ॥

तुजवरि मन ईचें यापरी कां इयेला ॥
त्यजसि सुमे-शरानें हा असा बोध केला ॥
तृण-कण गणि जैसें त्यासि धैर्यें गणीतो ॥
युवतिसि मग बोले राज-चूडामणी तो ॥९८॥

॥ वसंततिलका ॥

आहेस कीं सुखवती कमनीय लीळे ॥
निश्चित कीं हृदय होय तुझें सुशीळे ॥
आतां नकोच अवलंब निलंबनाचा ॥
हेजीब मी समज मुख्य सुराधिपाचा ॥ ९९ ॥

॥ स्वागता ॥

जो धरी निज—करीं शत—कोटी ॥
ज्याशि नम्र सुमनः शत—कोटी ॥
तो सुरेंद्रहि तुला नत याची ॥
हा असो वर, तुला न तयाची ॥ २०० ॥

॥ घनाक्षरी ॥

तया इंद्रा करीं धरीं ॥ अथवा तयाचे शेजारीं ॥
नांदे जो तेजो-निधी भारी ॥ तया वरीं राजसे ॥ १ ॥
तोही येईना जरी मना ॥ तरी वरावें शमना ॥
अथवा करूनि करुणा ॥ त्या वरुणा वरीं कीं ॥ २ ॥

---

१ मदन. २ उशीराचा. ३ नम्र होऊन. ४ याचना करितो. ५ बरोबरी. ६ अग्नि. ७ यमाला.

ऐसें बोलतां भूपाळ ॥ काय बोले ते वेल्हाळ ॥
कांहो बोलतां पाल्हाळ ॥ नाम कुळ सांगावें ॥ ३ ॥

॥ वसंततिलका ॥

बोले नृपाळ पुससी मज वंश नामें ॥
यावीण सांग तटलीं तुझि काय कामें ॥
आलों सुधांशु-मुखि जे घटना कराया ॥
तीतें विचारुनि वरीं सुरलोक-राया ॥ ४ ॥

॥ घनाक्षरी ॥

बोले सुंदरी तयासी ॥ स्व-वंश-नाम न सांगसी ॥
तरी आह्मी पर पुरुषासीं ॥ वदणें मर्यादा नोहे ॥ २०५॥
तिचा पाहुनियां कोप ॥ काय बोले नळ-भूप ॥
चंद्रवंशाचें हें रोप ॥ माझें जाण राजसे ॥ ६ ॥
महाजनाचा आचार ॥ निजनामाचा उच्चार॥
करूं नये हें साचार ॥ शास्त्राधार आहे कीं ॥ ७ ॥
पुन्हा बोलते सुंदरी ॥ चंद्र-वंशी महीवरी ॥
बहु आहेत ते परी ॥ नामें घेतां जाणवे ॥ ८ ॥

॥ गीति ॥

मी वासुदेव ऐसें स्वनाम मुरहर वदे सकळ-वेदी[२] ॥
आधार तोचि मानुनि निजाभिधानासि कवण न निवेदी ९

॥ घनाक्षरी ॥

बोले नैषधेंद्र वाचा ॥ नाम हेंजैव[३] इंद्राचा ॥
किती साक्षेप नामाचा ॥ काय तेणें करिसी तूं ॥ २१०॥

---

१ दमयंती. २ जाणणारा. ३ दूत.

केला काय अंगीकार ॥ बोलूं इंद्रासी निर्धार ॥
तंव ते बोले सुकुमार ॥ चंद्राकार-वदनातें ॥ ११ ॥

॥ वसंततिलका ॥

ऐरावतावरि बसोनि विमानें-देशीं ॥
जो संचरे सुरपती सुख-संपदेशीं ॥
मी भूमिकेवरि असोनि तयास कांहीं ॥
मागावया तरि कशी मज लाज नाहीं ॥ १२ ॥

॥ घनाक्षरी ॥

नळावेगळा भ्रतार ॥ नलगे स्वप्नीं हें साचार ॥
ऐसा निश्चय विचार ॥ तंव राजेंद्र बोलतो ॥ १३ ॥
टाकुनि इंद्राचा संभ्रम ॥ धरिशी कां तूं नळ-भ्रम ॥
जाईल विश्राम-विभ्रम ॥ नसता श्रम होईल ॥ १४ ॥
तुझें सौंदर्य पहावया ॥ धरी सहस्राक्ष-काया ॥
तया वरीं देवराया ॥ नळ-माया टाकुनी ॥ २१९ ॥
अथवा तुज तो मोहला ॥ होऊं नेदी[२] नैषधाला ॥
यास्तव त्याच इंद्राला ॥ माळ गळां घालावी ॥ १६ ॥

॥ वसंततिलका ॥

येणेंपरीच अनळासि यमाधिपासी ॥
पाशीसही तरी वरीं ह्मणतां नृपासी ॥
आधार लेश न वदे नव-सारसाक्षी ॥
होते तयासि सुरनायक गुप्त साक्षी ॥ ॥ १७ ॥
ऐसा [३]-वंचक वदोनि नृपाळ आला ॥

---

१ आकाशांत. २ वरूं देत नाहीं. ३ प्रामाणिक.

इंद्रादिकांसहि निवेदित वृत्त झाला ॥
पाचारिले मग महींद्र विदर्भभूपें ॥
आले समस्तही सभेसि हर्ष-रूपें ॥ १८ ॥

॥ ओंव्या ॥

इंद्रादिक तेही अधिप ॥ धरूनि आले नळ-रूप ॥
सभे बैसले अमूप ॥ जेथें भूप शोभती ॥ १९ ॥
आला नळही भूपाळ ॥ कीर्तिरूपें जो विशाळ ॥
तदा दमयंती वेल्हाळ ॥ सखियांसीं बोलते ॥ २२० ॥
नळराज हिरा वरिला ॥ तोचि मनीं म्यां धरिला ॥
सुर किंवा नर भला ॥ न वरीं अन्यातें निश्चयें ॥ २१ ॥
ऐसें बोलोनी सुंदरी ॥ बैसे शिबिकेभीतरीं[1] ॥
आली राजसभांतरीं ॥ बरोबरी शारदा[2] ॥ २२ ॥
बोले शारदा तियेला ॥ ऐकें राजांच्या नामाला ॥
मना येईल तयाला ॥ माळ गळां घाली तूं ॥ २३ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

हा राजा ऋतुपर्ण नाम धरिता हारावली कंधरीं ॥
हा राहे शरयूसमीप नगरीं हा राजसे आदरीं ॥
हा राजीव-दलाक्ष सद्गुण-निधी फारा जनांचा महा ॥
थारा, हाच वरीं, रिपूंशि परते[3] सौरावयाचा पहा ॥ २४ ॥

॥ वसंततिलका ॥

एणें परीच बहु भूप निवेदिजेले ॥
हीच्या मनासचि न येति जगेचि ठेले ॥

---

१ पालखींत. २ सरस्वती. ३ परत फिरणारा.

जेथें वळी[1] धरुनि पंच-नळी[2] बसे ते ॥
तेथें विरिंचि-तनयेसमवेत[3] येते ॥ २२५ ॥

॥ घनाक्षरी ॥

बोले शारदा वचन ॥ येथें बाई सावधान ॥
बरें घालूनियां मन ॥ वर-लाभें सुखी हो ॥ २६ ॥

॥ वसंततिलका ॥

ज्यांचीं पदें धरिति देव शिरो-लशमी ॥
स्वाराज्य[4] जो मिरवितो गजराज-गामी ॥
जो वज्रपाणि बहुलोचन कांति भारी ॥
हा[5] पाहिजे तरि वरीं नळरूप-धारी ॥ २७ ॥
साहील कोण सजणे बहु तेज याचें ॥
मध्यस्थ[6]-रूप धरितो हरिचे यमाचे ॥
स्नेहा धरी अधिक होय तमासि वारी ॥
हा[7] पाहिजे तरि वरीं नळ-रूपधारी ॥ २८ ॥
संपूण ते समज यास्तव दक्षिणाशा ॥
पाप्यांस दंड धरितो करितो विनाशा ॥
देहीं जया मिरवते घनकांति भारी ॥
हा[8] पाहिजे तरि वरीं नळ-रूपधारी ॥ २९ ॥
आधार हाच सजणे बहु जीवनाचा ॥
रक्षी दयेंकरुनि मान ऋषी-जनाचा ॥
यादांस फार ह्मणती जन सौख्यकारी ॥
हा[9] पाहिजे तरि वरीं नळ-रूपधारी ॥ २३० ॥

---

१ रांग. २ पांच नळ. ३ शारदेसह. ४ स्वर्गाचें. राज्य. ५ इंद्र. ६ इंद्र व यम यांच्यामध्यें असलेला. ७ अग्नि. ८ यम. ९ वरुण.

होतील नंदन—विलास जयास तो हा ॥
आहे धनंजयहि धर्महि जाण तो हा ॥
रत्नाकरीं तुज विराजविता विहारी ॥
हो पाहिजे तरि वरीं नळ—रूपधारी ॥ ३१ ॥

॥ स्वागता ॥

शारदेस मग राजसुता हे । शारदेंदु—वदना वदताहे ॥
शेवटील नळ हा मज बाई । मानला बहु मनीं सुख-दाई ३२

॥ ओंव्या ॥

तेव्हां दमयंती सुंदरी ॥ इंद्रादिकां नमस्कारी ॥
तयां बोलली उत्तरीं ॥ अमृतापरीस मधुर ॥ ३३ ॥
माझा भीम जैसा पिता ॥ तैसे तुम्ही जी तत्त्वतां ॥
करा कन्यादान आतां ॥ नळनाथाचे करीं ॥ ३४ ॥

॥ द्रुतविलंबित. ॥

सुर समस्त इच्छया वर—निश्चयें ॥
सुरसें मस्त असें वदले स्वयें ॥
नळ—वराशि वरोनि सुखी असें ॥
तुज नको जन कोण म्हणे असें ॥ २३५ ॥

॥ वसंततिलका ॥

मावेचना सुख मनीं कमनीय बाला ॥
मायेसही विसरली न पुसेचि बाला ॥
दुर्वादिकीं कदलि—बंधं—मधूक-माळा ॥
तीनें अलंकृत करी नळ—कंठ—नाळा ॥ ३६ ॥

---

१ द्व्यर्थी शब्दांनीं चारही देवांचे गुण नळांत आहेत असें सुचविलें. २ नळ. ३ सुंदर. ४ शरदऋतूंतील पूर्ण चंद्राप्रमाणें मुख असलेली [ दमयंती ]. ५ मधुर. ६ पुष्कळ. ७ सुंदर. ८ आईला. ९ बापाला. १० दुर्वांनीं युक्त. ११ केळीच्या सोपटाच्या दोरांत गुंफलेली मधुक पुष्पांची माळ.

॥ ओंव्या ॥

चौथे श्रेष्ठ सुरेश्वर ॥ देते झाले अष्ट वर ॥
मस्तकीं ठेवोनि कर ॥ दोन दोन ऐकेकें ॥ ३७ ॥
देऊनियां तया वर ॥ स्वर्ग–भुवना गेले सुर ॥
निराश होऊनि नरेश्वर ॥ जाते झाले स्वस्थाना ॥३८॥

॥ शिखरिणी ॥

नृपाळाचे मांडीवरि बसुनि मांडी[1] हरिखें[2] ते ॥
तया पाहों आले जन सकळ झाले हरिखेंते[3] ॥
महा–वाद्यें नाना नि–नॅंदहि तनाना मग घडे ॥
पिता तीचा पाटीभर धनहि वांटी बहु विडे ॥३९॥

॥ ओंवी ॥

नाना–परींचें मिष्टान्न ॥ चारी दिवस भोजन ॥
वधू–वरें मिरवून ॥ घर-भरणी करविली ॥२४०॥
राजा निरोपा तें घेत ॥ मग दमयंती समवेत ॥
आपल्या नगरातें जात ॥ नांदे आनंद–भरें ॥२४१॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

लोकीं सौरभकाव्य नाटककलालंकार चूडामणी ॥
सर्वां नैषध–विद्वदौषध असे विख्यात वाग्धोरणी ॥
हे त्याचीच टिका टिकोनि घटिका ऐकेल जो आदरें ॥
बोले त्या रघुनाथपंडित–कवी भेटे हरी सादरें ॥ २४२ ॥

**इति श्रीनळ–दमयंती–स्वयंवराख्यान समाप्त.**

---

१ करी. २ आनंद. ३ आनंद पावलें. ४ आवाज.

# २ रामदास-वर्णन.

॥ वसंततिलका ॥

आम्हां-तुह्मांस भववारिधिमाजि तारूं[1] ॥
जे वाचितां परिसितां मग होय तारूं[2] ॥
जे दासबोध-रचना घडली जयाला ॥
वंदूं निरंतर तया गुरुराजयाला ॥ १ ॥
वैराग्य-भाग्य भरलें असतां अनन्या[3] ॥
आल्या जयाप्रति चतुर्विध मुक्ति-कन्या ॥
चौथी[4] तयांत वरिली, उरल्या न पाहे ॥
तो आमुचा गुरु-समर्थ समर्थ आहे ॥ २ ॥
श्रीरामदास-गुरु शांति-वधूस अंगीं ॥
अंगीकरूनि मिरवे स्वसुखांतरंगीं ॥
रंगीं उभा, कर उभारुनि वंदनाचे ॥
ज्याचे मुखीं गुण वदे रघुनंदनाचे ॥ ३ ॥
खेळावयास हनुमंत गडी जयाचा ॥
जो या महीवरि वसंत जितेंद्रियांचा ॥
ज्याचीं पदें प्रणमिताति[5] कवींद्र राजे ॥
श्रीरामदास गुरु तो अमुचा विराजे ॥ ४ ॥
जो डोंगरीं गिरिदरीं फिरतां न भागे ॥
ज्याची पवित्र घन कीर्ति जनीं विभागे ॥
जो तत्त्वबोध कविता करितां न मोजी ॥
तो रामदास गुरुवर्य नमो नमो जी ॥ ५ ॥

---

१ संसार समुद्रांत. २ तारक. ३ दुसरा कोणीच नसल्यामुळे.
४ सायुज्यमुक्ति. ५ वंदन करितात.

शोभे शतद्वय समास समास-भारी ॥
जो दासबोध निजबोध—सुखा उभारी ॥
त्या शेवटीं दशक जोडित जो विसावा ॥
श्रीरामदास-गुरु तो अमुचा विसावा ॥ ६ ॥

चिद्बोध-सेज अरुवारे[1] नव्या फुलांची ॥
सायुज्यमुक्ति ललना असतां जयाची ॥
तो रामदास अकलत्र[2] असें गणावें ॥
अज्ञान होत जन, काय तयां म्हणावें ॥ ७ ॥

जो लेखणीसहित कागद दौति वाहे ॥
तो दंड सद्गुण उदंड जयांत आहे ॥
हस्तीं तयासि मिरवी फिरवी विनोदें ॥
श्रीरामदासगुरु तो नमिला प्रमोदें[3] ॥ ८ ॥

जो भर्जरी सरस पाटलवर्ण[4] चेलें[5] ॥
शोभे, जयास लघुसें निटिळीं[6] अवाळें ॥
बोले समर्थ रघुवीर समर्थ ऐसें ॥
तो मी स्तवीन निजसद्गुरु वाग्विलासें[7] ॥ ९ ॥

जेणें प्रशिष्य[8] निजशिष्य अनेक केले ॥
देतां प्रसाद कफनी कफ नीट जाले ॥
लोकाभिराम गुण बोलत राम कर्ता ॥
साष्टांग वंदन करीन तया समर्था ॥ १० ॥

---

१ मृदु. २ अविवाहित. ३ आनंदानें. ४ भगव्या. ५ वस्त्रांनीं.
६ कपाळावर. ७ गौरवयुक्त वाणीनें. ८ शिष्यांत प्रमुख.

श्रीरामदास-गुरुवर्णन-रूप-पद्यें ॥
वृत्तें ' वसंततिलका ' सुजनैकहृद्यें[1] ॥
संख्या करूनि दशकावरि एकतेनें[2] ॥
केली अपूर्व रघुनायकपंडितानें ॥ ११ ॥

श्रीरामदासवर्णन समाप्त.

---

# ३ गजेंद्रमोक्ष.

॥ स्रग्धरा ॥

कोठें वैकुंठ कोठें गजपतिस वकें नक्र वेढी तटाकीं ॥
तेथें जो लागवेगें-करुनि पवनसा धांवला पावला कीं ॥
तो स्वामी, स्मर्तृगामी[3], निरवधि करुणासिंधु बंधू प्रणामी ॥
लक्ष्मी, वत्सें लर्ल्मी[4] स्मरुनि निजमना माजि गाथीन नामी १

॥ शार्दूलविक्रीडित. ॥

कैसा तोयचरें[5] गजेंद्र धरिला तोही तया माधवें ॥
कैसा सोडविला करूनि करुणा भक्तैकहृद्बांधवें[6] ॥
हें आम्हीं परिसूं परिक्षिदवनीनाथें[7] असें बोलतां ॥
झाला श्रीशुक बोलता परिसतां राजा सुखें डोलता ॥२॥

॥ स्वागता ॥

उंच[8] योजनशतें शत साजे ॥ लांब रुंदहि तसाच विराजे ॥
तो त्रिकूट शिखरीवरि तुंगें ॥ स्वर्ण-लोह-रजतात्मक[9] शृंगें ॥३॥

---

१ सज्जनांना आवडणारीं. २ दहा अधिक एक. ३ स्मरण केल्याबरोबर जाणारा. ४ श्रीवत्सलांच्छन आहे भूषण ज्याला असा विष्णू. ५ नक्रानें. ६ भक्तांना हृदयांत वागविणाऱ्या बांधवानें (प्रभूनें). ७ परिक्षिती राजानें. ८ उंच. ९ सुवर्ण, लोह, व रुपें यांनीं ज्याचीं शिखरें व्याप्त आहेत असा.

॥ वसंततिलका ॥

शृंगाभिधानक विशाळ धरूनि भाला ॥
तेणेंकरूनि गिरि तो गिरितो नभाला ॥
जोपा झरे-जल-तृणें करितो मृगांची ॥
जो पाझरें निज तटाक-तरां तसाची ॥ ४ ॥

॥ उपजाति ॥

जयावरी होय निगा नगांची ॥ सदैव विश्रांति खगामृगांची ॥
जोगे जयाचे उदरीं दरींचे ॥ विलास तेथें सुर-सुंदरींचे ॥ ५ ॥

॥ पृथ्वी ॥

नदीनद तयावरी सजल जे तयांचे तटीं ॥
पटीरनिकटीं वटीं जटिल तांदळांचे पुटीं ॥
कटीं धरुनि गोमटीं हरिवधूटिका लेंकरें ॥
फळें भरुनि तन्मुखें करिति सन्मुखें ही करें ॥ ६ ॥

॥ वसंततिलका ॥

उद्यान येक ऋतुपाख्य तया त्रिकूटीं ॥
केलें स्वतंत्र वरुणें निजकेलिसाठीं ॥
नाना फुलीं विकसतां सकळांस भासें ॥
हें या मिसें—करुनि चैत्ररथास हासें ॥ ७ ॥

॥ द्रुतविलंबित ॥

चिगुरले, फुलले, फळले तसे ॥
तरु च भूषण तें वन लेतसे ॥

---

१ शिखररूपी. २ जोपासना. ३ आपल्याठायीं असलेल्या सरोवरांच्या कांठाबाहेर. ४ झाडांची. ५ सिद्ध असे. ६ आपल्या क्रीडे करितां. ७ इंद्राचे स्वर्गांतील एका वनास.

सकाळिकां काळिकांस विकासवी ॥
मधु सुवास निवास विकासवी ॥ ८ ॥

॥ वंशस्थ ॥ *

लते-तळीं रुंद निरुंद कालवे ॥
गळोनि तेथं मकरंद कालवे ॥
परागही सांद्र तयांत रंगती ॥
फुलांसवें भृंग-तती तरंगती ॥ ९ ॥

॥ मालिनी ॥

रुचति मधुर जैसीं चांगलीं तूपकेळें
सुरुचिर रचि तैसीं लागलीं तूपकेळें ॥
शिवति गगन तैशा नारिकेळी रसाळें ॥
सहित फळ कदंबें सांद्र केळी रसाळें ॥ १० ॥

॥ आर्या ॥ *

उपरि स-कंटक साचे परंतु साचे जयांत सु रसाचे ॥
घोंस तसे फणसांचे षण्मासांचे तसेंच वर्षांचे ॥ ११ ॥

॥ उपजाति ॥

विख्यात नामें लवली-लता जे ॥ फलावलीनें लवली विराजे ॥
चंद्रोदयीं घोंस तिचे फुलांचे ॥ होती विसांवे अलिनी-कुलांचे ॥

॥ स्रग्धरा ॥

दाळिंबें स्वादु लिंबें कुरबक बदरी वृक्ष सीताफळांचे ॥
जेथें जंबू-फळांचे समुदय पिकले घोंसही श्रीफळांचे ॥

---

* अशी फुलें ज्या कवितवर आहे ती कविता यापूर्वी नळ-दमयंती-स्वयंवराख्यानांत आली आहे. १ त्या स्थानीं. २ पसरत असे. ३ [ रंगामुळें ] शोभतात ४ भुंग्यांचे समुदाय. ५ बाहेरून. ६ वर्षांचे. ७ भुंग्यांच्या समुदायांचे.

वेळाचे वेळ व.चे न वदवति जसे ते तसे वेळ वांचे ॥
शाखीं वायू जयांचे विवरें रवें करी जोड जे पावयांचे ॥१३॥

॥ उपेंद्रवज्रा* ॥

तया वनीं एक तटाक तोयें ॥ तुडुंबलें-तामरसान पायें- ॥
निरंतरानंद मरंदं वाहे ।, तपांतही यास्तव रिक्त नोहे ॥१४॥

॥ वसंततिलका* ॥

पीता मरंद उदरंभर--बंभरांचे ॥
जें होय मंदिरहि सुंदर इंदिरेचे ॥
तें पद्म तेथिल सहस्त्र दलां धरीतें ॥
प्रत्यक्ष सूर्य-किरणांस विसाववीतें ॥१५॥

॥ पृथ्वी ॥

तया वन-सरोवरीं उमलतां सरोजें रजें ॥
मिळोनि मिरवे दळीं सलिलें मौक्तिकाकार जें ॥
तयास सम आणिकें कवण माणिकें मोकळीं ॥
असोत, परि पोवळीं दिसति कोवळीं कोवळीं ॥१६॥

॥ गीति ॥

मधुपांचीं खिल्लारें सरोवरांमाजी कुमुद-कल्हारें ॥
इंदु-विकास, विलासें होतीं नकळां समान सोल्लासें ॥१७॥

॥ द्रुतविलंबित ॥ *

अमृतही पयही ह्मणवीतसे ॥
मधुर सारस तें जल गा तसें ॥

---

१ छिद्र. २ आवाज. ३ वाजविण्याच्या पावाप्रमाणें ४ पुष्करस. ५ ग्रीष्मऋतूंतही. ६ भुंग्याचे. ७ कमळाच्या. ८ परागांनी. ९ पानांवर. १० पाणी. ११ भुंग्यांचीं. १२ कमळांच्या जाती. १३ चंद्रविकासी. १४ आनंदयुक्त. १५ [ संबोधनार्थी ].

मधुर सारस यास्तव गातसे ॥
उभय होय तसी रुचि वीतसे ॥ १८ ॥

॥ अनुष्टुप ॥

राजहंसी[1] तया तोयीं, राजहंस विसावती ॥
चक्रेंही चक्रवाकांचीं, चक्राकार विराजतीं ॥ १९ ॥

॥ मालिनी ॥

ऐसें तराकें[3] वरुणोपवनांत जेथें ॥
पूर्वोक्त पर्वत–वनस्थ गजेंद्र तेथें ॥
येतो कुटुंब-समवेत तृषार्त झाला ॥
मार्तंडचंड-किरणीं अति तप्त केला ॥ २० ॥

॥ शिखरिणी ॥

सखे मामे भाचे चुलत पुतणे आणि चुलते ॥
सखे ही सांगातें सळमिसळ झाले सकळ ते ॥
स्त्रियाही जावांयी तनुज निज सार्थींत दडती ॥
सतीचे बोलावे कळतिल गजेंद्रास पुढती ॥ २१ ॥

॥ वसंततिलका ॥

जो काननीं विचरला[4] चरला तृणातें ॥
धुंडीतसे तृषित चिल्हर थिल्लरातें[5] ॥
तो श्रीगजेंद्र जल–लोभ मनीं धरोनी ॥
दानांबु[6]पान करवी मधुपां करोनी ॥ २२ ॥

॥ मालिनी ॥

फिरत फिरत ऐसा येत होता पुढारीं ॥

---

१ परिक्षिति राजा. २ सरोवर. ३ झाडींत. ४ फिरला. ५ पाण्याचें डबकें. ६ गंडस्थळांतून मदोदक वाहतें त्याचें पान.

तंव वन वरुणाचें, लक्ष झालें निडारीं[1] ॥
त्वरित शिरुनि तेथें उंच वाहेस वाहे ॥
तृषित गज तटाकीं तुंबळ[2] अंबु पाहे ॥ २३ ॥

॥ शिखरिणी ॥

तटाकाचे तोयीं हळुच उतराया चतुर तो ॥
पुढारी दो पायीं तनुभर उपायीं उतरतो ॥
जलातें आरंभीं स्वकर–विवरामाजि[3] भरितो ॥
मुखापासी नेतो गजवर पितो नैं वरपतो ॥ २४ ॥

॥ वसंततिलका ॥

धाला[4], जलेंकरुनि सिंपितसे कपोळीं ॥
दानोदकावरिल भृंग–कुळें उडालीं ॥
आले सर्व निजकुलोद्भव जे तिहींशीं[5] ॥
क्रीडा करूं उतरला गज निम्न-देशीं[6] ॥ २५ ॥
वोढी सनाळ कमलांस तटीं झुगारी ॥
हस्तींद्र शैवल–लतेस उरें विदारी ॥
माथां निमग्न करितां उदकीं उदेले[7] ॥
दानांबुतैलज तवंग सवंग झाले ॥ २६ ॥
ऐसा करी जल–विहार करी[8] तटाकीं ॥
बाहेर सत्वर मदांध निघेच ना कीं ॥
नक्रें तया अवचितेंचि धरोनि पायीं ॥
आकर्षिलें करुनि शक्ति अगाध तोयीं ॥ २७ ॥

---

१ दृष्टीपुढील २ तुडुंब भरलेलें. ३ सोंडेंत. ४ तृप्त झाला. ५ त्यांचबरोबर. ६ खोल [ पाण्यांत ]. ७ उत्पन्न झालें. ८ हत्ती.

॥ द्रुतविलंबित ॥

ग़जक्रजोनि घन-ध्वनि-भैरवें ॥
गरजला गजराज वनारवें ॥
निजबळें पद वोढुनि झाडितो ॥
प्रबळ नक्र मिठीस न सोडि तो ॥ २८ ॥

॥ वसंततिलका ॥

जें ग्रस्त तें पद सुटूं गज युक्ति दावी ॥
नक्रावरी पद दुजें उचलोनि रोवी ॥
कं[1]टकौघ रुपतांच तळां[2]तरंगीं ॥
माया करी चपळ तोयं[3]-तरंग-संगीं ॥ २९ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

सोंडेनें सुसरीस वोढुनि जळाबाहेर काढूं तटीं ॥
पाषाणावरि आपटूनि रगडूं पाहे धरी शेंपुटी ॥
तेथें कंटक टोंचले शिरकले पार्नायें[4]-नासापुटीं ॥
श्वासोच्छ्वास न होयसा गवसला हस्ती तशा संकटीं ।३०॥

॥ शिखरिणी ॥

गजेंद्राचे बंधू कवळुनि गजेंद्रा निजकरीं ॥
कडे काढूं वोढूं सकळ शिणले ही बहुपरीं ॥
तयां नाटोपेसें करुनि सुसरीनें वळ तसें ॥
दिले झोले नेला गजवर जळीं जेवि न दिसे ॥ ३१॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

कांहींसा उफ[5]ळे जळीं गज बळें कांहीं तळा लागतो ॥
हो बाहेर निघोन येइल असा लागे च ना लाग तो ॥

---

१ काटयांचा समुदाय. २ तळपायांत. ३ पाण्याच्या लाटांना ४ सोंडेच्या खालच्या भागांत. ५ वर येई.

वर्षांचीं शतकें दहा ढकललीं तीरस्थ होते करी ॥
जे तेही सुसरीस तों निरखितां गेले क्षणाभीतरीं ॥ ३२ ॥

॥ शिखरिणी ॥

विचारीं तैं हस्ती दृढ मज जयांचे भरवसे ॥
तसेही गेले कीं विषमसमयीं सोडुनि कसे ॥
असो आपद्बंधू यदुपति कृपेचा जल-निधी ॥
स्मरूं, बाहूं, पाहूं धणि-वरि उभा राहिल कधीं ॥ ३३॥

॥ द्रुतविलंबित ॥

पर-विदार-विलास-विशारदें ॥
क्रकच-दारुण नक्र तशा रदें ॥
चगाळितो गिळितो घन वेदना ॥
न वदवे मज एक मधुसूदना ॥ ३४ ॥
श्रुति-पुटीं नयनीं नयनांतरीं ॥
मज करीं जळ हें भरलें तरी ॥
भरतसे वरिचेवरि नावरे ॥
जलचरें धरिलें हरि धांव रे ॥ ३५ ॥

॥ स्वागता ॥

पुच्छ-कंटक-कठोर-सुरानें ॥
घोर घाय रचिले सुसरीनें ॥
तेवि तीसही करी करवाळी ॥
श्रीहरी मज करीं कुरवाळी ॥ ३६ ॥

---

१ एका क्षणांत. २ तृप्त होईपर्यंत. ३ दुसऱ्याचें विदारण करण्यांत जो आनंदी व निपुण [ नक्र ]. ४ तीक्ष्ण करवतीच्या. ५ दात्यांनीं. ६ [ घाव ] मार. ७ तरवारीनें.

वोणवा करुनि घांस गिळीसा ॥
वोणवा[1] गिळिसि गोपविलासा ॥
जो मदीय–विपदग्नि उभा रे ॥
तो तसा गिळितसा नें[2] उभारे[3] ॥
ज्यांत काळिय-विषौघ उदेले ॥
तोय तें पिउनि गोप निजेले ॥
ते हरी तव कृपारस सेवीं[4] ॥
वाचले त्रिजग ही परिसे कीं ॥ ३८ ॥
नाँच काळियफणांवरि टांचे ॥
कीं जसा न मणि तें पिळ टांचे ॥
तद्वधू[5] तुज असें विनवीसें ॥
नाचलास यदुराज विलासें ॥
माधवा मृदुरवें भरलीनें[6] ॥
मोहिलें जग तुवां मुरलीनें ॥
ते उगाचि अधरीं न धरावी ॥
एक वेळ मज तेवि करावी ॥ ४० ॥
चोजँ[7] कायँ भुवनत्रय-पोटीं ॥
वाहसी नग[9] तसा नग[8] बोटीं ॥
तें असो अणु–समान मना या ॥
वागवी निजपदीं यदुराया ॥ ४१ ॥

---

१ वणवा [ श्रीकृष्णलीलेंतील अग्निभक्षणाबद्दल. ] २ पुनः उत्पन्न न होईल असा. ३ शेवटें. ४ ( क्रियापद. ) ५ नाग–स्त्रिया. ६ भरलेल्या. ७ केवढें ( आश्चर्य ). ८ दागिना. ९ पर्वत.

हे रजोयुत इला न शिवावें ॥
हे न मानुनि तुवां निज--भावें ॥
द्रौपदी पट–शतावृत केली ॥
वा तुझी अतुळ कीर्ति उदेली ॥ ४२ ॥

॥ पद ॥

प्राण विसाव्या रामा येसील कधीं निरखति जें तुज डोळे ॥
विश्रांति तयीं ॥ धृ० ॥
कोणी राम–रघूत्तम–राघव वदतां ऐसी वाणी ॥
गमतें मजला आला कार्मुक-पाणी ॥
निरखूं तुजला हृदयिं धरुनि शिराणी । धांवें उगलों ॥ १ ॥
निटिलं-तटीवरि ठेऊनि बांहे भरल्या नेत्रनिडोरें ॥
मी वाट तुझी पाहतसे अविचारें ॥
ये राघवजी तुजविण असुनिहि सारें ॥
हा जीव न जी ॥ २ ॥
रघुपतिपंडित भजे अखंडित असतां नुसतां रुससी ॥
या कोपभरें किति मान वरवत असी हें सांग खरें ? ॥
भावें धरितां दिससी हें काय बरें ॥
प्राणविसाव्या रामा ॥ ३ ॥

॥ वसंततिलका ॥

देवेंद्र जैं रिचवलाचें बलाहकांतें ॥
तैं गोकुळावरि तुवां धरिलें नगातें ॥

---

१ धनुष्यधारी. २ आवड. ३ निहूटाणें (धांव) ४ कपाळावर. ५ बाहू. ६ उत्सुक दृष्टीनें. ७ पाऊस पाडूं लागला. ८ डोंगरास.

केलें सुखी सकळ गोकुळ गोप पाहीं ॥
भक्तैकबांधव हरी तुजवीण नाहीं ॥ ४३ ॥
पोहे पसाभर करीं तुज दे सुदामा ॥
पोहे[1] तयास्तव तया सदनीं सदा मा[2] ॥
तो नांदला सम जया सुरराज कांहीं ॥
भक्तैकबांधव हरी तुजवीण नाहीं ॥ ४४ ॥
वांचावया विजय-वीर उपाय केला ॥
भीष्मासमीप पण ही तृणतेस नेला ॥
सारथ्य सांग रचिलेंच रथीं तुवां ही ॥
भक्तैकबांधव हरी तुजवीण नाहीं ॥ ४५ ॥
नाटोपतां मगधराज वृकोदरानें[3] ॥
पाहून खूण समजूनि तुझ्या करानें ॥
केला पदीं मग धरूनि विदीर्ण देहीं ॥
भक्तैकबांधव हरी तुजवीण नाहीं ॥ ४६ ॥
जागा तुवां करविला मुचकुंद तो कीं ॥
काळासही करुनि भस्म निजावलोकीं[4] ॥
राहे सुखी तुज विलोकुनि मुक्ति-गेहीं ॥
भक्तैकबांधव हरी तुजवीण नाहीं ॥ ४७ ॥

॥ पद ॥

थोर हे उपेक्षा माझी आदरिली काय मुकुंदा ॥ ध्रु० ॥
धांवलासि सज्जणा[5] स्मरतां संकटीं प्रल्हादासाठीं ॥
पावलासि पांचाळीतें नेसविल्या अंशुककोटी[6] ॥

१ नांदे. २ लक्ष्मी. ३ भीमानें. ४ आपल्या अवलोकनानें. ५ हे सख्या. ६ असंख्य वस्त्रें.

न दिसे ते तांतडि मोठी । करुणा ये ना कां पोटीं ॥
करुणा[1]-वरुणालय हे गोविंदा ॥ धृ० ॥ १ ॥
इंदिराकळत्रा[2] इंद्रें वर्षतां घन घन धारा ॥
गोवर्धन उचलुनि केला त्वां गोकुळ-लोकां थारा ॥
रजनीनायक-कुल-हीरा[3] । रजनी-दिन मी यदुवीरा ॥
भजनीं तंव तत्पर टाकुनि धंदा ॥ २ ॥
जेवढीं अगण्यें[4] दुरितें[5] म्यां केलीं प्रतिपळ घटिकां ॥
तेवढींहि जरि भोगविसी तरि कैसी मा[6] मज सुटिका ॥
कमलासन-मन्मथ-जनका ॥ कमलानन यादव-तिलका ॥
विमळा[7] परिपालित-नृप-मुचकुंदा ॥ ३ ॥
वंचनाचि[8] अवधी मजसी करिसी तूं सुरवर-वरदा ॥
कांचनांबरा[9] हरि आतां ये रे बा नवकुंद-रदा ॥
दीनोद्धारक या बिरुदा[10] ॥ राखो गति-विजित-द्विरदा ॥
रघुनायकपंडित चित्सुखकंदा ॥ ४ ॥

॥ वसंततिलका ॥

नाहींस काय मजमाजि जगन्निवासा ॥
हा मान तो तुज आळसपणें तमासा ॥
येणेंपरी परिसतां अति दीन वाणी ॥
भक्तापुढें प्रगट होय रथांगपाणी ॥ ४८ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

लक्ष्मीतें हृदयीं धरी तिजसवें श्रीवत्सही श्रीहरी ॥
हस्तीं कंबु-सुदर्शनांबुज-गदा हे आयुध स्वीकरी ॥
शोभे विष्णु[11] रथावरी निवसला सोनेसळा[12] नेसला ॥
आला नीरधराभिराम निकटीं हस्तींद्र उल्लासला ॥ ४९ ॥

---

१ कृपासागर. २ लक्ष्मीपती. ३ चंद्रवंशांतील हिरा. ४ असंख्य. ५ पापें. ६ तर मग. ७ हे निर्मळा. ८ थट्टाच. ९ पीतांबरधारी १० थोरवीस. ११ गरुडावर. १२ पितांबर.

माथां दिव्य करीरनीर निटळीं कस्तूरि विस्तारली ॥
कंठीं कौस्तुभकांति शार्ङ्ग[1]लतिका अंसस्थळीं[2] थारली[3] ॥
सांगातीं चतुराननादि[4] विरुदें[5] गाती असा भासला ॥
आला भक्त जनैकबांधव हरी हस्तींद्र उल्लासला ॥ ५० ॥
कर्णीं कांचनकुंडलें तळपती तेजें कपोलांकणीं[6] ॥
केयूरें[7] भुज-पारिजात फुलले, माजी क्वणत्किंकिणी[8] ॥
पायीं नूतन नुपुरें कलरवें भासे सवें बोलिला ॥
आला भक्तजनैक बांधव हरी हस्तींद्र उल्लासला ॥ ५१ ॥

॥ पद ॥

श्रीहरि घणिवरि देखिला ॥ मनिं रेखिला ॥
सखा लेखिला, माझा भक्तिरसें केला अखिला राजि
राखिला ॥ आजि यादवराजा ॥ धृ० ॥
पुनवेचा चांद विराजतो, तरि लाजतो ॥
मुखदर्पण तैसा कुंडलमणिगणिं साजतो ॥
करुनि साज तो ॥ यदुराज तो ऐसा ॥ १ ॥
गीत—गमकगति सुंदरि कंबुकधरी[9] त्रिवळी[10] धरिताहे ॥
हार उरीं[11] सरसोदरीं[11] शशिसोदरीं[12] तीस आदरी पाहे ॥ २ ॥
सरळभारि भुजा-लता, स-विशालता, फुलता ॥
ती नगांनीं[13] कल्पतरूसम शोभता ॥
कर-लाभता-लोभता[14] वरदानी ॥ ३ ॥

---

१ धनुष्याची कमान. २ खांद्यावर. ३ स्थिर राहिली. ४ ब्रह्मदेवा-दिक. ५ नाममहिमा. ६ कुंडलामुळें गालांवर जी खूण पडली होती तिजवर. ७ बाहुभूषणें. ८ कण कण असा आवाज करणाऱ्या घागऱ्या. ९. शंख धारण केलेला ( विष्णु ) १० ( विष्णूच्या ) पोटावर अस-लेल्या शोभादायक तीन वळ्यांना. ११ भव्य असलेल्या पोटावर व उरावर. १२ जणूं दुसरा चंद्रच. १३ फुलांनीं ( भूषणांनीं ) १४ ( आणि असा हा विष्णूचा सुंदर हात प्राप्त करून घेतां येण्या-जोगा असून शिवाय वर देण्याविषयीं सिद्ध आहे.

उदरीं जगत्रय धारलें, नवल थोरलें त्रिवळीस्तव भासें ॥
नाभि-सरोज विकासलें । ज्यातें पोसलें विधिलेंकरूं हांसे ४

कांस कसुनि सोनेसळा बाप नेसला ॥
तेणें गुल्फपावेतों[1] मुदा[2] मुनिजनीं सेविला ॥ हृदयीं ठेविला ॥
पद झेंपावेतों[3] ॥ सुमसम कोंवळें पावलें ॥ भक्ता पावले ॥
ज्यांच्या निजनखचंद्रें ॥ संतचकोर भले ॥
भलें सुख पावले ॥ रघुनाथ कवींद्रें ॥ ६ ॥

॥ वसंततिलका ॥

तो पूजिला गजवरें वरि वारिजातें[4] ॥
देवें करी उचलिला कर–पारिजातें ॥
चक्रेंकरुनि खळ–नक्र विदारिजेला ॥
आत्मानुरक्त निजभक्त विमुक्त केला ॥ ५२ ॥

॥ स्रग्धरा ॥

इंद्रद्युम्नाभिधान द्रविड-कुळमणी पांड्यराजा हरीतें ॥
ध्यातां मौनस्थ होतां तंव घट-ज-मुनी क्रुद्ध बोले तयातें ॥
माझें आतिथ्य कैसें न करुनि धरिलें ध्यान हे काय मस्ती ॥
यासाठीं शाप येयीं विचरसिल वनीं मत्त होसील हस्ती ॥
राजेंद्रें नम्रभावें उपरि विनवितां बोलिजेतें ऋषीनें ॥
हूहूगंधर्व कांहीं चुकत तंव तया शापिलें देवलानें ॥
तो जाला नक्र तोयीं धरिल तुज तदा मुक्ति दोघां तुह्मांतें ॥
शौरी[5] देयील ऐसें कलशभव वदे जाइ हो स्वस्थळातें ॥९४॥

---

१ पायाच्या घोट्यापर्यंत. २ प्रीतीनें. ३ पावलांकडे पाहिलें असतां ४ कमळानें. ५ विष्णु.

॥ शार्दूलविक्रीडित ॥

तो हा श्री गजराज यासि दिधली देवें स्वरूपस्थिती ॥
नक्रातें शिवतांच होय मग तो गंधर्व दिव्याकृती ॥
स्वामीचे गुण गाय पाय नयनीं पाहे धरी अंतरीं ॥
पावे उत्तम लोक पाहुनि तया आश्चर्य केलें सुरीं[1] ॥ ५५ ॥

॥ पद ॥

वैं समुदाय सुमनांचे[2] ॥
हरिवरि वरिसाव करि सुमनाचे ॥
भेरीरव कराया ॥
विलंब कैंचा असेल नृपराया ॥ ५६ ॥

॥ मालिनी ॥

गजवर निजरूपें धन्य केला मुकुंदें ॥
स्व-वसतिस-हि नेला चित्सदानंदकंदें ॥
इतर गज पळाले साधिलें काय तेही ॥
सुलभ-लभ तयांला श्रीहरी होत नाहीं ॥ ५७ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

श्रीमद्भागवतांतरंग चतुराध्यायीं[3] महा कौतुकें ॥
राजेंद्रास गजेंद्रमोक्ष पहिलें जो बोलिजेला शुकें ॥
जो गातां अवधारितां सुखकरी तें मुक्ति नांदे करीं ॥
तो शोभे रघुनाथपंडित निजव्याहार–काव्यांतरीं ॥५८॥

**श्रीगजेंद्रमोक्ष संपूर्ण.**

---

**समाप्त.**

---

१ देवांनीं. २ देवांचे. ३ अष्टमस्कंधाच्या चवथ्या अध्यायांत.

# रघुनाथ पंडितासंबंधानें उपलब्ध असलेली अल्प माहिती.

जयंति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः ॥
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ॥

भर्तृहरी.

अर्थः—रसिकपणानें सिद्ध झालेले कवीश्वर सर्वोत्कर्षें करून राहतात; कारण ज्यांना यशरूपी शरीरीं जरेचें व मरणाचें भयच नाहीं.

आरंभीं येथें ही गोष्ट नमूद करून ठेविली पाहिजे कीं, इतर साधु-संत, कवि आदिकरून श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रासंबंधानें महत् प्रयासानें मिळाली तेवढी माहिती पुष्कळांनीं प्रसिद्ध केलेली आहे, तद्वतच रघुनाथपंडितांच्या संबंधानेंही माहिती मिळविण्याचा बऱ्याच लोकांनीं प्रयत्न केलेला आहे व अद्याप चालू आहे, तत्रापि कोणालाही यामध्यें यश मिळालेलें ऐकिवांत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. चरित्र उपलब्ध होण्याला दोन गोष्टी कारणीभूत होतात. एक कवीनेंच स्वतः संबंधानें कोठें कांहीं लिहून ठेविलें असेल तर; आणि दुसरें त्याच्या समकालीन कवींनीं अगर शिष्यांनीं अथवा पुढील पिढ्यांनीं कांहीं लिहून ठेविलें असेल तर, परंतु प्रस्तुत कवीच्या चरितासंबंधानें शोध करण्याला वरील दोन्ही गोष्टींपैकीं एकही उपयोगी पडलेली दिसत नाहीं.

रघुनाथपंडितांच्या संबंधानें माहिती ह्मणून छापलेली मला फक्त तीनच ठिकाणीं वाचावयास मिळाली. ( १ ) 'नवनीता'च्या नव्या आवृत्तींतून ( २ ) 'लोकमित्र' कर्ते रा. सडेकर यांच्यामार्फत श्रीयुत आपटे यांनीं 'कविचरित्र' ह्मणून दोन भागांत प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत व ( ३ )'ग्रंथमालेंत' प्रो. राजवाडे यांनीं 'रघुनाथ पंडित' या सदराखालीं लिहिलेली माहिती. या माहितीचा

सारांश पुढीलप्रमाणें आहे:—नवनीतांत लिहिलें आहे—'या कवीनें केलेला असा एकच (!) लहानसा ग्रंथ प्रसिद्ध आहे, त्याचें नांव नल-दमयंती-स्वयंवराख्यान. हा ग्रंथ संस्कृत भाषेतील नैषध काव्याच्या आधारानें केलेला आहे. हा फार सुरस असून ह्यांत यमकादि शब्दालंकार व उपमादि अर्थालंकार चांगले साधलेले आहेत; आणि वृत्तेंही नानाप्रकारचीं योजिलेलीं आहेत. रघुनाथपंडिताच्या कवितेंत श्लेषरचना बरीच आढळते; व तेणेंकरून स्थलविशेषीं कवितेस दुर्बोधत्व आलें आहे; तथापि एकंदरीनें पाहतां ह्याची कविता हृदयंगम आहे. हा कवी शालिवाहन शकाच्या १७ व्या शतकाच्या अखेरीस होता असें ह्मणतात. ह्याखेरीज ह्या कवीचें वृत्त कांहींच माहीत नाहीं.' तसेंच कविचरित्रांत या कवीसंबंधानें माहिती देतांना आरंभीं कवितेसंबंधानें बरीच स्तुती असून पुढें कवीबद्दल कांहींच माहिती नसल्याचा उल्लेख आहे. तथापि त्या ठिकाणीं हा कवि १७ व्या शतकाच्या अखेरीस असावा असें लिहून, पंडिताच्या काव्यांतून कित्येक महत्वाचे व हृदयंगम उतारे वगैरे देऊन चरित्र संपविलें आहे. परंतु ग्रंथमालेंत मात्र यासंबंधानें असा उल्लेख आहे कीं, (१) 'मद्रास इलाख्यांत आरणी ह्मणून जें शहर आहे त्यांत चार मराठी कवी झाले; पहिला आनंदतनय, दुसरा रघुनाथपंडित, तिसरा सुभानराव (?] व चौथा गोप्रावीनंदन. आरणीचे महाराष्ट्र ब्राह्मण त्या प्रांतीं धिप्पाडपणा, राकटपणा, व शूरपणा ह्या तीन गुणांबद्दल प्रसिद्ध आहेत. "**कंगाल हे ब्राह्मण आरणीचे ॥ परंतु ते शूर रणांगणींचे** ॥" हा श्लोकार्ध सर्वांमुखीं त्या प्रांतीं असलेला अढळून येतो. [ २ ] रघुनाथपंडिताचें दमयंती-स्वयंवर प्रसिद्ध आहे. त्याखेरीज रामदास—वर्णन व गजेंद्र-मोक्ष अशीं दोन पद्यें तंजावरास भाऊ स्वामींच्या मठांत सांपडलीं. [ ३ ] रामदासवर्णनांत कवी आपणा स्वतःस रामदासाच्या शिष्यवर्गांत गणतो; व वर्तमानकालाचा उपयोग करून वर्णनसमयीं समर्थ जिवंत होते असें दर्शवितो. यावरून रघुनाथपंडिताचा समय-

शक १५८२ पासून १६४२ पर्यंत असावा असें निश्चयानें विधान करणें शक्य होतें. [ ४ ] हा कवी बराच वयातीत वारला असें ह्याच्या खालील उक्तीवरून दिसतेः—

ह्मातारा बहु जाहलों, कवणही त्राता नसे भेटला ॥
भाताची तजवीज तेच उदरीं भाता गमे पेटला ॥
हातामाजि नसेच येक कवडी हा ताप आतां हरी ॥
दातारा मज वाचवी सदय हो माता पिता तूं हरी ॥ १ ॥

हा श्लोक रघुनाथ पंडितांचा ह्मणून तंजावरांतील बहुश्रुत लोक सांगतात. श्लोकावरून असें दिसतें कीं, इतर अनेक कवींप्रमाणें रघुनाथपंडित फुटक्या कवडीलाही महाग होऊन उतारवयांत वारला. याचा मृत्युकाल सुमारें शक १६४२ [ इ. स. १७२० ] धरावा. [ ५ ] पंडितांचे गजेंद्रमोक्ष काव्य नल–दमयंती–स्वयंवरा-इतकेंच हृदयंगम आहे. अंतर्गत सौंदर्यामुळें तर तें प्रिय होईलच, पण नाविन्यामुळें जनांच्या कृपादृष्टीस तें पात्र होईल अशी खात्री वाटते.

येथील एका सद्गृहस्थाकडून मला समजलें आहे कीं, आनंद-तनय व रघुनाथ पंडित हे नातेवाईक होते, अशी एक दंतकथा आहे.

असो. यापेक्षां ज्यास्त माहिती मिळण्याचा सुयोग लवकर यावा अशी परमेश्वराजवळ शेवटची प्रार्थना आहे.

REFBK-0000544

६७४